मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

म प्र

# हितगुज

अंक ९७ ✦ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✦ मार्च २०१४

वेबासाईट : www.marathepratishthan.org ✦ ई-मेल : maratheparivar@yahoo.co.in

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय



प्रिय कुलबांधवांना आणि कुलभगिनींना माझा स्नेहपूर्वक नमस्कार.

दि. २६ जानेवारीला मराठे प्रतिष्ठान पुणे शाखेचा ३५वा वर्धापदिन मोठ्या उत्साहाने आपण थाटामाटात साजरा केला. कार्यक्रमाला उपस्थितीही चांगली होती. ते पाहुन पुणे-मुंबईच्या कार्यकारिणी सदस्यांना हुरुप आला आहे. वेदशास्त्रोत्तेजक सभागृही सारख्या प्रज्वलंत आणि पवित्र वास्तूत दरवर्षी आपला वर्धापन दिन साजरा होणे ही भाग्याची गोष्ट आहे.

दै. केसरीतील एका अग्रलेखात लोकमान्य टिळक लिहितात "नाडीवरुन शरीराची परीक्षा होते, तद्वतच भाषेवरुन राष्ट्राची बरी वाईट स्थिती तज्ञ ताडतात (जाणतात). छत्रपती शिवाजी महाराज जन्मण्यापूर्वी पोवाडे का झाले नाहीत. याचे कारण आता सांगण्याची जरुरी नाही. शिवाजी महाराजांचा अभ्युदय म्हणजे मराठी भाषेचा अभ्युदय...




व्यासपीठावर विराजमान झालेले श्री. मोहनराव मराठे, उपाध्यक्ष श्री. सी.गो. खांबेटे आणि अरुणराव मराठे "वार्धक्य आणि गुंतवणूक" या विषयावर भाषण करताना श्री. गजानन मराठे

लोकमान्यांच्या सांगण्याचे तात्पर्य एवढेच की, आपल्याकडे इच्छाशक्ती असेल, तर खूप काही घडू शकते. आपल्याला हितगुजच्या बाबतीतही हेच सांगता येईल. आपल्या कुलबांधवांची जबरदस्त इच्छाशक्ती असेल जर हितगुजची ज्योत तेवत ठेवायची असेल तर आंतरिक जाणिवेतून स्फूर्ती घेऊन आपण ती तेवत ठेवू."

आता "हितगुज" सेंच्युरी मारणार आहे. डिसेंबर २०१४ चा हितगुजचा शंभरावा अंक निघणार आहे तो कसा असावा? त्याचे स्वरुप काय राहावे? कोणकोणत्या साहित्याला प्राधान्य द्यावे आणि ते प्रकाशित करावे. हितगुजचा ७५ वा अंक सप्टेंबर २००८ मध्ये प्रकाशित झाला होता. त्यावेळच्या अंकात मुलखतींवर भर दिला होता. विविध क्षेत्रात आपला ठसा उमटविणाऱ्या "शायनिंग मराठे" यांच्या वैशिष्ट्यपूर्ण मुलाखतींनी तो अंक सजला होता. आता हा शंभरावा अंक कसा काढावा.

◉ संपादिका : डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे : ८/१३, सहकारनगर, वडाळा, मुंबई-४०००३१ ◉

दूरध्वनी : २४१५०८८९ ✦ ई-मेल: prabhakar_marathe@yahoo.com

✦ अक्षरजुळणी : श्री. राजेंद्र एस. पेडणेकर, नालासोपारा, ठाणे - फोन : ९३२३३९१२६० ✦

Marathe Pratishthan

आपण विचार करुन ठेवा। आपल्या कल्पना सांगा. मित्रांनो, कल्पनाशक्तीला मर्यादा नसतात. ज्ञानाला मर्यादा असतात. शुक्रवारी दि. १७ जानेवारीला सुलभाताईंच्या घरी प्रतिष्ठानची बैठक झाली तेव्हा अध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस आणि आनंदराव मराठे म्हणाले? "वहिनी , तुम्ही याविषयी स्पर्धा ठेवा. जो चांगली कल्पना मांडेल त्याला प्रतिष्ठानाद्वारे बक्षिस दिले जाईल. मार्चच्या अंकात तसे आवाहन करा" त्यांच्या या सूचनेला मान देऊन या अंकात स्पर्धा जाहीर केली आहे. तेव्हा शक्यतो लवकरात लवकर आपली मते आपले विचार पाठविण्याची विनंती करीत आहे. हितगुजचा शंभरावा अंक कसा असावा या विषयी प्रतिक्रिया अवश्य लेखी स्वरुपात संपादिकेच्या पत्त्यावर पाठवण्यात याव्यात.

नुकताच माघी गणेशोत्सव सर्वत्र साजरा करण्यात आला तेव्हा श्रीमती जयश्री मराठे यांचा गणेशाच्या २१ आकड्याचे रहस्य हा माहितीपूर्ण लेख, मोहनराव मराठे यांचे वायनाड केरळ भेट हे प्रवासवर्णन, पश्चिमेचा गंगासागर - स्तंभेश्वर हा श्री. सदाशिव बळवंत मराठे यांचा उद्‌बोधक लेख, संजय अनंत मराठे यांचा गंध हा लेख इ. साहित्याचा समावेश या अंकात करण्यात आला आहे. आठवड्यात दोन-तीन दिवस सलग सुट्या जोडून आल्यावर अस्सल भटक्यांना वेध लागतात. गिरिप्रेमींची पावले शिखरावर गडावर चढायला लागतात. शहरी गजबजाटापासून दूर निसर्ग त्यांना खुणावत राहतो. श्री. निरंजन मराठे या ट्रेकरने आपल्याला सहयाद्रिच्या गडकिल्ल्यावर नेऊन आणून भटकंतीचा भटकंतीचे आनंद मनमुराद लुटायला दिला आहे. हे त्याचे एकोल्याचा एकटा आणि कोऱ्या मनावरचा कोरिगड, लेख वाचले की याचा अनुभव येईल. एकूणच विविध साहित्यांनी हितगुज अंक दिवसेदिवस वाचनीय होत आहे, असो...

दिनांक २३ फेब्रुवारी २०१४ ला हिंदु महा सभेचे भूतपूर्व अध्यक्ष, स्वातंत्र्यवीर सावरकरांचे कृतीशील अनुयायी विक्रमराव सावरकर ह्यांचे तळवली १२ गांव येथे दु:खद निधन झाले. ते माझे संपादकीय गुरु होते. कै. विक्रमरावांना मी हार्दिक श्रद्धांजली वहाते. (हितगुज २००९ जूनच्या ७८ व्या अंकात मी विक्रम सावरकरांवर संक्षिप्त लेख लिहिला होता).


आपली शुभचिंतक

डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ. १२०)

८/१३, सहकार नगर, वडाळा,

मुंबई - ४०० ०३१.

दूरध्वनी : २४१६०८८९


(दि. २४ फेब्रुवारी २०१४)



कैलास मानसरोवर यात्रा वर्णन
श्रीमती रोहिणि चक्रदेव यांची मुलाखत घेताना श्रीनिवास मराठे



सुरेल संगीताचा कार्यक्रम सादर करताना,
सौ. मंदा देवधर व डॉ. सौ. सविता विद्वांस पेटीवर श्री. माधव मराठे

Marathe Pratishthan

# मराठे प्रतिष्ठान वर्धापन दिन वृत्त

सौ. निर्मला प्रभाकर मराठे

मराठे प्रतिष्ठान पुणे शाखेचा ३५वा वर्धापन दिन रविवार दिनांक २६ जानेवारी २०१४ रोजी वेदशास्त्रोत्तेजक सभागृह येथे अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात साजरा आला. सौ. अनुपमा जोसी राव या मराठ्यांची माहेरवाशीण असलेल्या युवतीने रसाळवाणीने उत्कृष्ठप्रमाणे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले कु. प्राची अजय मराठे हिते गोड आवाजात गणेशस्तवनाने कार्यक्रमास सुखात केली. नंतर सौ. सरोजिनी मराठे यांनी ईश्वराची आराधना सुरेख आवाजात सादर केली.

व्यासापीठावर मराठे प्रतिष्ठानाचे उपाध्यक्ष सी.गो. खांबेटे, कार्यवाह श्री. मोहन मराठे, हितगुजच्या संपादिका डॉ. सौ. सुमेधा मराठे व पुण्याचे श्री. अरुण मराठे स्थानापन्न झाले. अरुण मराठे यांनी व्यास पीठावरील मान्यवरांचा नारळ व गुलाबपुष्प देऊन सत्कार केला, पुण्यातील गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्रक व रोख बक्षिस देऊन श्री. सी.गो. खांबेटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये पुम्यातील आदिती प्रमोद चक्रदेव ८९% तनया प्रशांत मराठे ८६%, मधुरा विपीनचंद्र आपटे , ९५% प्रियांका मिलींद मराठे ९६% व शुभंकर मिलींद आपटे ९०%. या विद्यार्थ्यांचा समावेश होता.

यानंतर सौ. सुमेधा मराठे यांनी हितगुज चांगल्या प्रकारे कसे करता येईल याबद्दल आपले विचार व्यक्त केले. श्री. मोहन मराठे यांनी हितगुज चांगल्या प्रकारे कसे करता येईल याबद्दल आपले विचार व्यक्त केले. श्री. मोहन मराठे यांनी वर्धापन दिन अधिक उत्साहपूर्ण व मोठ्या संख्येने कसा करता येईल याबाबत आपेल विचार व्यक्त केले. तरुण लोकांनी सक्रीय भाग घेणे आवश्यक आहे असे सांगितले. हितगुजचा अंक आकर्षक व परिणामकारक कसा होईल. याबद्दल आपले विचार मांडले. उडपी येथे आलेल्या संमेलनाचा वृत्तांत कानडी भाषेत भाषांतरीत केला आहे. पुढील संमेलन कर्नाटकातील शिरसी येथे होणार असल्याचे सांगितले.

श्री. गजानन मराठे यांनी वार्धक्य आणि गुंतवणूक यावर आपले विचार अतिशय सोप्या भाषेत व्यक्त केले. आयुष्याचे चार भाग कसे पडतात हे सांगून प्रत्येक भागासाठी गुंतवणूक कशी करावी लागते याबद्दल मार्गदर्शन केले योग्य गुतवणुक असेल तर वार्धक्य सुसहय होण्यास कशी मदत होते याबद्दल स्पष्टीकरण केले. प्रत्येकाने मृत्यूपत्र करणे. आवश्यक असून त्यासाठी वयाची कोणतीही अट नसल्याचे सांगितले वृद्धांनी पचेल ते खावे व रुचेल ते बोलावे असे सांगितले श्री. खांबेटे यांनी नारळ व गुलाबपुष्प देऊन गजानन मराठे यांचा सत्कार केला.

यानंतर केलास मानस सरोवर यात्रा हा दृकत्राव्य कार्यक्रम आला. श्रीमती रोहिणी चक्रदेव यांनी यात्रा कशी सफल झाली. त्यासाठी अगोदर व्यायाम, चालणे, ध्यान व योग याचा मार्ग कसा आचरणात आणला ते सांगितले. या यात्रेसाठी मेडीकल चेकअप आवश्यक असून नंतर जर शारीरिक दृष्टया काही अडचण आली तर त्या प्रवाशांना परत नेपाळला पाठविले जाते. त्यांनी स्लाईडस दाखवून अतिशय सुंदर थरारक अनुभव सांगितले त्यामुळे प्रत्यक्ष न जाता देखील तेथे जाऊन आमचा भास होत होता. श्री. श्रीनिवास मराठे यांनी त्यांची मुलाखत घेतली. श्री. वा.ग. मराठे यांनी दोघांचाही सत्कार केला तसेच गाण्याच्या कार्यक्रमातील गायक, वादक व निवेदक यांच्याही श्री. वा.ग. मराठे यांनी सत्कार केला.

यानंतर सुरेल सुगम संगीताचा कार्यक्रम मराठ्यांची माहेरवाशीण सौ. मंदा देवधर व डॉ.सौ. सविता विद्वांस यांनी अतिशय छान प्रकारे सादर केला. संगीत कार्यक्रमाची सुरुवात सौ. विद्वांस यांनी गणेशस्तवनाने केली. सौ. देवधर यांनी देवीचे स्तवन व संगितातील अनेक नाविन्य प्रकार सादर केले. बलसागर भारत होवो, सुवर्णतुला नाटकातील नाट्यगीत सुधीर फडके यांची भावगीते, अनेक जुन्या चित्रपटातील सुंदर गीते सादर केली. वैशाली सामंत व अवधूत गुप्ते यासारख्या नविन गायकांच्या गाण्यांचाही त्यात समावेश होता. भैरवीने या संगीत कार्यक्रमाची सांगता झाली. सौ. मंदा देवधरांचे बंधू श्री माधव मराठे यांनी त्यांना



Marathe Pratishthan

पेटीची साथ केली होती.

सौ. नीलांबरी मराठे यांनी दोन सूचना आवर्जून केल्या. त्यात गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांनी आपली मार्कशीट व अर्ज ३१ ऑगस्ट पर्यंत मुंबईला पाठवावा. पुण्यातील विद्यार्थ्यांना २६ जानेवारीला बक्षिसे दिली जातील. मार्कशीट जानेवारी महिन्यात आमची पत्रे मिळाल्यानंतर कुलबांधव आणून देतात. त्यामध्ये विद्यार्थी व त्याच्या आईवडीलांपेक्षा आजी आजोबांचाच उत्साह असतो. विद्यार्थ्यांच्या आईवडीलांनी पुढाकार घेतल्यास प्रतिष्ठानशी संपर्क वाढू शकेल. आणि दुसरे म्हणजे २६ जानेवारीला ज्यांना कार्यक्रम सादर करण्याची इच्छा असेल त्यांनी कमीत कमी २,३ महिने आधी संपर्क साधावा म्हणजे त्यांनी संधी देता येऊ शकेल. आमची कार्यक्रमाची पत्रे मिळाल्यानंतर लोकांचे फोन येतात व आमचा कार्यक्रम ठेवा म्हणून आग्रही असतात. कार्यक्रम पूर्ण ठरलेला असतांना त्यांना मधे थोडा वेळ देऊन कार्यक्रम थांबतो व नियोजीत कार्यक्रमाला पुरेसा वेळ मिळू शकत नाही. शेवटी लोकांना जाण्याचीही घाई होते. त्यामुळे उपस्थिती कमी राहते. यात सुधारणा व्हावी ही अपेक्षा.

शेवटी मटाराच्या करंज्या, गाजराचा हलवा व कॉफी या अल्पोपहार लज्जत घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

दिल्लगिरी : चि. अव्दैत अतुल मराठे हा विद्यार्थी आंधळा असूनही त्याने १२वी कलाशाखते ६४% गुण मिळवले. त्याच्या आजीने अर्ज व मार्कशीट आधीच मुंबईला पाठवली होती. परंतु काही चुकीने ती पुण्यात आमच्यापर्यंत पोचू शकली नाही. त्यामुळे त्याला बक्षिस देता आले नाही. आता मुंबईतून प्रशस्तीपत्रक व त्याचे बक्षीस त्याला घरपोच पाठविण्यात येत आहे. झालेल्या चुकी बद्दल क्षमस्व.

## प्रतिष्ठान वृत्त

शुक्रवार दि. १७ जानेवारी २०१३ ला मराठे प्रतिष्ठानची बैठक संध्याकाळी ४.०० वा श्रीमती सुलभाताई सुरेश मराठे यांच्या निवासस्थानी माहीम येथे भरली.

बैठकीला अध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस, श्री. आनंदराव मराठे, श्री. मोहनराव मराठे, श्री. सी.गो. खांबेटे, श्री. प्रभाकर दामोदर मराठे, डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे, श्री. हेमंत अरुण मराठे, श्री. श्रीनिवास मराठे, श्री. सुरेश मराठे, श्री. विनायक मराठे, बोरिवली, सौ. प्रतिभा अशोक मराठे, श्री. शैलेंद्र भास्कर मराठे, श्रीमती सुलभाताई मराठे इ. उपस्थित होते.

अहवाल वाचन झाले. हितगुजच्या १०० व्या अंकाविषयी चर्चा झाली. श्री. मोहनराव मराठे यांनी , माळ येथे मराठे कुळबांधवाचे संमेलन भरले. ५१ कुलबांधव त्यांच्या परिवारासह ऊपस्थि होते. देवाला भाताच्या खिरीचा नैवेध दाखवून ते नवान्न पौर्णिमा मोठ्या उत्साहात, हौशीने साजरी करतात. या कार्यक्रमाची सविस्तर वर्णन आपले कुलबांधव श्री. गजानन मराठे यांनी लिहून पाठविले होते, ते वाचून दाखविले (या अंकात ते छापले आहे).

श्री. विनायक मराठे, बोरिवली यांनी हितगुजची वर्गणी रु.२००० दिली. लगेच त्यांना पावती देण्यात आली. पुण्याच्या २६ जानेवारीला वर्धापनदिन कार्यक्रमात कोणाकोणाला जाणे शक्य होणार आहे हे ठरले. डॉ. सौ. सुमेधाताईंनी गुहागरात व्याडेश्वरचरणी हितगुजचा अंक ठेवला ते सांगितले आणि पेढ्याचा प्रसाद वाटला.

कार्यवाह : श्री हेमंत अरुण मराठे (नालासोपारा) यांच्या सौ. मृणालताईंनी खुसखुशीत स्वत: तयार कलेला गुळाच्या पोळ्या खास करुन पाठविल्या होत्या. त्या उत्कृष्ट गूळपोळ्यांचा आस्वाद घेतला. सुलभाताईंनी नेहमीप्रमाणे आदरातिथ्य केले. चहा-फराळानंतर पुढच्या मिटिंगची दिनांक ठरवून सभा संपली.

विषय सेविता कोण तृप्त झाले ?
इंधने निमाला अग्नी कोठे ?
स्तुती करावी भगवंताची,
करु नये व्यर्थ ती मानवाची चित्त शुद्ध
तरी शत्रु मित्र होती । व्याघ्र न खाती सर्प तया तीर्था
जाऊनिया तुवा काय केले । चर्म प्रक्षाळिले वहि वाटी धनवंतालागी ।
सर्व मान्यता हे जगी ......**तुकाराम महाराज**



Marathe Pratishthan

ॐ

# कर्नाटक मराठे स्नेहसंमेलन

**दिनांक : १४.१०.२०१३**
**विजयादशमी**

श्री सतीश मराठे ("कजे हाऊस" माळा गाव) येथे झालेल्या कर्नाटक मराठे परिवाराच्या स्नेहासम्मेलनाला उपस्थित असलेल्या ५१ मराठे बांधवांच्या उपस्थितित कार्यक्रम सुरु झाला. सकाळी ११ वाजता मराठे परिवाराचे गौरवाध्यक्ष "श्री विष्णु मूर्ती मराठे" यांच्या हस्ते कार्यक्रमाला सुरुवात झाली. परिवाराचे कार्यदर्शी "श्री अनंत वामन मराठे" यांनी आलेल्या पाहुण्याचे आणि इतर मराठे बांधवांचे स्वागत केले. तसेच परिवारातील ज्येष्ठ "श्री. श्रीकर नारायण मराठे" (कोप्पल गाव) आणि "डॉ. पद्मनाभनाग भूषण मराठे" (मलहितलू गाव) ह्यांची उपस्थिति होती.

कुमारी विजयश्री हिच्या स्वागत गीता नंतर, परिवाराचे उपाध्यक्ष श्री. रत्नाकर मराठे ह्यांनी पाहुण्यांच्या परिचयानंतर याच दिवशी म्हणजे विजयादशमीच्या सोहळ्या निमित्त आणि श्री सतीश मराठे यांच्या शेतात नवीन पीक आल्या कारणाने "नवान्न भोजन" हा सोहळा ज्याच्यात शेताचे पहिले देवा नैवेद्याचा रुपाने अर्पण करुन त्याचाच प्रसाद घेतला जातो. अशी माहिती सर्व पाहुण्यांना दिलेली व हा दिवस निवडण्याचे कारणही सर्वासमोर मांडले. सभेत आलेल्या. प्रत्येकाने परिचय करुन दिले व पाहुण्यांचे आणि अध्यक्षांचे भाषण झाल्यावर "श्री श्रीकंठ फाटक" ह्यांनी सगळ्यांचे आभार मानले.

दुपारी १.०० वाजता देवाच्या प्रसादाच्या रुपाने भोजनाचा कार्यक्रम पार पडला. कार्यकारिणी आणि बांधवांची महासभेला सुरुवात झाली. श्री. सदानंद मराठे ह्यांच्या प्रार्थनेनंतर "श्री. केशव रामचंद्र मराठे" ह्यांनी सभेचं स्वागत केलं. या सभेत खालील दिलेले मुद्दे मांडण्यात आले.

१) श्री. अनंत वामन मराठे ह्यांनी सभेची परवानगी घेऊन हिशोबाची अहवाल मांडला.

२) नवीन कार्यकारि समितीच्या राज्यस्तरीय प्रतिनिधींना एकत्र आणून नवीन समिति रचण्याबद्दल दिलेल्या सल्ल्यावर अनुमोदन झाले. श्री. केशव मराठे ह्यांनी सुचविलेल्या समिति मध्ये ११ जणांची आवश्यकता असल्याचा ठराव झाला.
श्रीधर मराठे ह्यांचा सल्ल्यानुसार रेजिस्ट्रेशन फी ५.०० रुपये आणि प्रत्येक घरातल्या वयस्क बांधवांना सभासद करुन घेण्याबद्दल आणि सर्व जिल्हा स्तरीय प्रतिनिधींना एकत्र आणून कारकळ तालुक्यात मुख्य शाखा स्थापन करायाचा ठराव झाला.
नवीन कार्यकरिणी खालील प्रमाणे स्थापन केली.

१) श्री. श्रीकर नारायण मराठे : (कोप्पल) कोषाध्यक्ष.
२) श्री. पुराणीक (शंकर) मराठे (माळा) अध्यक्ष
३) श्री. गजानन मराठे (बेंगळुरु) उपाध्यक्ष
४) श्री. गदाधर मराठे (मैसूर) संचालक
५) श्री. सतीश मराठे (माळा) कोषाध्यक्ष
६) श्री. केशव मराठे एम (दूर्गा) कार्यदर्शी
७) श्री. रत्नाकर राम मराठे (बेंगळुरु) सभासद
८) श्री. कालिंग मराठे (शिर्सी) सभासद
९) श्रीमति पावना मराठे (दूर्गा) सभासद
१०) श्री. अनंत मराठे (माळा) सभासद

ह्या नंतर योग्य वाटल्यास सभासदांमध्ये वाढ करण्यात येईल.

३) नवीन कार्यकारिणीला नगद, बँक पास बुक, मुदत ठेवी चे कागदपत्र हस्तांतर केले आणि ह्या बाबतीत बँकेला माहिति देण्याचे ठरवले.

४) बनवासी गावामध्ये श्री. भगवान परशुराम मंदिराच्या बांधकामासाठी परिवाराकडून ५०००/- (पाच हजार) रुपयांची देणगी श्री कलिंग मराठे ह्यांच्याकडे सुपूर्द केली.

५) श्री. कलिंग मराठे यांच्या विनंतीला मान देऊन मे २०१४ महिन्यात शिर्सी परिसरात कर्नाटक मराठे परिवाराचा स्नेह सम्मेलन करण्याचे सर्वानुमते ठरविले.

सभेच्या शेवटी सांस्कृतीक कार्यक्रम घेण्यात आला. त्यामध्ये श्री. मोहन चिपळूणकर ह्यांचे वायोलीन वादन तसेच श्री. वासूदेव मराठे आणि श्रीमती सुजया ह्यांचे भक्ती गीते आणि श्री. हरी मराठे त्यांचे मृदंग वादनाचे कार्यक्रम सादर करण्यात आले हा कार्यक्रम दीड तास चालला.

शेवटी श्री. सतीश मराठे ह्यांनी दिलेल्या आदरातीथ्य व कार्यक्रमासाठी दिलेल्या जागे बद्दल त्यांचे व त्यांच्या कुटुंबाचे आभार श्री. केशव मराठे ह्यांनी मानले. अश्या रीतीने कार्यक्रमाची सांगता झाली.

**श्री. गजानन मराठे - बेंगलुरु**
९-बी फोर्थ क्रॉस, AG's Layout
न्यू बेल रोड, बंगलोर - ५६००५४.
दूरध्वनी : ०८०-२३६०७६३५



Marathe Pratishthan

# पुत्रप्राप्तीसाठी केली जाणारी कुवेड़ी

**या माहितीचा आधार बाणभट्ट विरचित कांदंबरी आहे.**

राज्ञी विकासवतीनें देवतांची आराधना, ब्राह्मणांची पूजा, गुरुजनांची पूजा सुरु केली. तिनें मुसळांच्या शय्येवर झोपण्यास आरंभ केला. जो कोणी (खरें तर जी कोणी असणें योग्य!) कांही उपाय सांगेल तो करुं लागली. त्यासाठी होणाऱ्या कष्टांचा मनात विचार ही आणला नाही. चंडिकेच्या ज्या मंदिरांमध्यें सतत गुग्गुळ पेटत असल्यामुळे होणाऱ्या धुरामुळें कितीहि त्रास झाला तरी ती शुभ्र वस्त्रें नेसून जाऊलागली तिंथे ती हिरव्या कुश गवतावर ठेवलेल्या मुसळांवर झोपू लागली. दररोज सोन्याच्या कुंभात पाणी घेऊन सुळक्षणी गायींच्याखाली बसून स्नान करुं लागली. दररोज रत्नजडित सुवर्णपात्रांतून ब्राह्मणांना तीळ देऊ लागली. अनेक राजांसह बद्यचतुर्थीला रात्री चौकांत जाऊन स्नान करुं लागली. नवसाला पावणाऱ्या देवतांच्या मंदिरांत दानें दिली. आपला प्रभाव दाखवणाऱ्या जवळच्या मातृकामंदिरांत सेवा अर्पण करु लागली. ज्या डोहांमध्ये नाग असतात त्या डोहांमध्ये स्नान करु लागली. वटवृक्षादि महावृक्षांना प्रदक्षिणा घालू लागली. चांदीच्या पात्रांतून कावळ्यांना पोळ्यातून काढलेला ताजा मध देऊ लागली. विविध फुलांच्या सुगंधानें, धूपानें सुगंधित केलेले अनरसे कावळ्यांना देऊ लागली. (धन्य ते कावळे!) तसेच अनारसे अंबादेवीला देऊं लागली. ज्यांचे बोलणे खरे ठरते अशा नग्नसाधूंना प्रश्न विचारू लागली. त्यांचे बोलणें मानू लागली. शुभ-शकून सांगणाऱ्या जाणकारांना मान देऊ लागली. पारंपारिक कुवेडी जाणून घेऊ लागली. पारंपारिक रहस्यें जाणून घेऊ लागली. वेदज्ञ ब्राह्मणांकडून वेदश्रुतींचे जप करुन घेऊ लागली. पुराणांतील पुण्यकथा ऐकू लागली. भूर्जपत्रावर गोरोचन चंदनानें किसलेले मंत्रकरंडक (ताईत) धारण करुं लागली. कोल्हींना मासांचे नैवेद्य रात्री देऊ लागली. स्वप्नांचे फळित सांगणाऱ्या आचार्यांना स्वप्नें सांगू लागली. चौकांत जाऊन कोल्हींना बळी - खाद्य - देऊ लागली.

ज्या काळांत भौतिक विज्ञान प्रगल्भ नव्हते त्या काळांतील हे सर्व उपाय आहेत.

**पूर्णपात्र हरण - बोल**

**उत्सवेषु सुहृद्भिर्यद् बळादाकृष्य गृह्यते ।**

**वस्त्र माल्यं च तन्पूर्णपात्रकं च ।**

आनंदाच्या प्रसंगी मित्रमंडळी आपल्या मित्रांच्या अंगावरील उपरण्यासारखी वस्त्रें ओढून घेतात - अर्थात् आनंदाची लूट म्हणून - त्याला पूर्णपात्र म्हणतात.

राजाला पुत्र झाली की लोक दुकानें सुद्धा (हक्कानें) लुटत. मात्र त्यांची भरपाई राजा करीत असे. आज आपण चांगल्या प्रसंगी स्वत: सुहृदांनां पेढे, बर्फी वाटतो. इथे लूट नसली तरी खिसा रिकामा करणें आहे ! (आजहि आपण वाटतें इतकें सुसंस्कृत नाही !)


**श्री. अ.द. मराठे (पृ.२७०)**

६, मंजूषा, विकास हौ. सोसायटी,

शास्त्रीनगर, डोंबिवली (प.) ४२१२०२

दूरध्वनी : ०२५१ २४९९८४२

मोबा. : ९८५०२४१९१३


## स्पर्धा

### हितगुज चा १०० वा अंक कसा असावा ?

प्रिय कुलबांधव भगिनिंनो येत्या डिसेंबर २०१४ ला आपला हितगुज शंभरीत पदार्पण करीत आहे. हितगुजचा अमृतमहोत्सवी अंक-७५ वा, मुलाखतींवर भर देणारा होता. दर तीन महिन्यांनी प्रकाशित होणाऱ्या आपल्या "हितगुज" मधे कथा, कविता, गोष्टी, चरित्रात्मक - वर्णनात्मक निबंध, वाचकांचा पत्र व्यवहार, मानसमान, वाढदिवस, विवाहकार्य, मुंजी, कुलबांधवांच्या कार्याची माहिती त्यांच्या प्रगतीच्या आढावा, स्मृतीदिन, निधनवार्ता, प्रतिष्ठान-वृत्त इं. साहित्य प्रकाशित केले जाते. आता शंभरावा अंक कसा असावा ? शंभराव्या अंकाचे स्वरुप कसे असावे ? आपल्या मनात त्याविषयी काही विचार येतील. तेव्हा हातात लेखणी घ्या आणि पाठवा आमच्याकडे, "हितगुजचा १०० वा अंक कसा असावा ?"

याविषयी ज्यांच्या प्रतिक्रिया चांगल्या, सर्वोत्तम ठरवील त्यांची योग्य दखल घेऊन त्यांना पारितोषिक देण्यात येईल. तरी लवकरात लवकर आपल्या प्रतिक्रिया, आपली मते, आपले विचार अवश्य पाठवावे ही विनंती. पत्ता पुढील प्रमाणे:

**संपादिका - हितगुज**

**डॉ.सौ. सुमेधा प्रभाकर मराठे**

८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१. दुरध्वनी - २४१५०८८९.

Marathe Pratishthan

# भ्रम

डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे (पृ.१२०)

दुपारची वेळ. जेवण आटोपल्यावर दिवाणखान्यातील सोफ्यावर मी निवांतपणे दुरदर्शन बघत होते. पण सुस्तीमुळे किंचित डुलकी लागली. नाही तरी दूरदर्शनवरचे रटाळ कार्यक्रम पाहता पाहता झोप लागतेच. यावेळी झोपेचे निमित्त जेवण झाले इतकेच.

दार मोठ्याने ठोठावल्याच्या आवाजाने जागी झाले. खरे तर आमच्या दाराला बेल आहे. थोडी उंचावर आहे. आणि दाराच्या चौकटीवरील नक्षीकामाला मॅचिंग असा बेलचा रंग आहे. नेहमी येणारे बेलच वाजवितात. पण कोणा नवख्याला बेल असल्याचे लक्षात आले नाही तर दार ठोठावण्याचा प्रसंग ओढवतो.

दार अुघडायला जाताना कोणी तरी नवखे आले असे वाटले.

कोण बरं यावेळी आले असेल ? नेहमीच्या परिचितांपैकी कोणी येणे यावेळी शक्य नव्हते.

वास्तविक अशा प्रसंगी दाराची कडी काढण्यापूर्वी बाहेर कोण आले आहे हे कळण्यासाठी दाराच्या भिंगातून बघण्याची माझी सवय. पण बाहेरून दार पुन्हा जोराने ठोठावल्यामुळे मी सरळ दारच ऊघडले.

बाहेर एक जोडपे ऊभे होते, पोशाख आणि हातातील सामानावरुन ते गवंडीकाम करणारे असल्याचे लक्षात आले.

मग आठवण झाली की, सकाळी घरदुरुस्तीकरणाऱ्या कंत्राटदाराने दहा वाचता मजूर पाठविणार असल्याचे कळविले होते. ती वेळ टळल्याने आज काही दुरुस्ती करणारे ऊगवत नाहीत असे वाटले.

आणि आता दुपारी झोपमोड करण्यासाठी घरदुरुस्ती करणारे आल्याने किंचित रागही आला.

...परंतु रागावून चालण्यासारखे नव्हते. महिनाभर तगाद लावल्यानंतर, अगदी "ओळखीच्या" कंत्राटदाराने आज ऊशीरा का होईना मजूर पाठविले. आपल्यालाच गरज ना? असा विचार करुन झोप झटकून, मनातला राग गिळून, मी खोटे स्मित करुन त्या मजूर जोडप्याला आत घेतले. घरात कोणत्या खोलीत कसली दुरुस्ती करायची आहे ते समजावून सांगितले.

दुरुस्ती तर बरीच होती. हे दोघेच मजूर किती पुरे पडणार ? म्हणून मी विचारले "आणखी" कोणी मुकादम वगैरे कामाला येणार नाही का ?

त्यावर ते दोघेही हसले. एकदमच म्हणाले, "होय तर. रामण्णा मागून येतीलच की, आम्हास पुढे जाऊन काम बघण्यास सांगितले आहे," अशी पुस्ती बाईने जोडली.

मी त्यांना ब्लॉकच्या चार खोल्या दाखविल्या, दिवाणखान्यात दुरुस्तीची आवश्यकता नव्हती. स्वयंपाकघर, झोपण्याची खोली, कोठीची खोली यात काय दुरुस्त करायचे ते त्यांना दाखविले. सर्वात शेवटी न्हाणीघरातील डागडुजी करायची असल्याचे सांगितले.

त्या मजुरांनी स्वयंपाक घरात ठाण मांडले. जवळच्या पोतडीतून सामान बाहेर काढून ठेवले. मी पुन्हा दिवाणखान्यात परत आले दूरदर्शन बंद केले आणि मासिक चाळत बसले. इतक्यात, "बाई, जरा पाणी देता का ?" असे मंजूळ आवाजात बाईने विचारले.

आता माझे मन तिच्या व्यक्तिमत्वाचा विचार करू लागले. मध्यम उंची, काळाशार रंग, परंतु सतेच अंगकांती आणि कोरीव लेण्याप्रमाणे प्रमाणबद्ध शरीर, कपाळावर ठशठशीत कुंकू. गोल चेहरा, अपरे नाक, नाकात चमकी आणि मोठाले काळेशार डोळे. नाजूक जिवणी. बोलताना तिची पांढरीशुभ्र दंतपक्ती चमकायची. मोठ्या फुलांच्या डिझाइनची लाल साडी. अंगात मळकट निळा ब्लाऊज.

मी तिला पाणी देण्यासाठी तिच्याबरोबर स्वयंपाकघरात गेले. तेथे जमीनीवर तिचा जोडीदार मांडी घालून बसला होता. पुढ्यात शिदोरी होती. तो ही बळकट अंगकाठीचा आणि तिच्यासारख्याच वर्णरुपाचा होता जणु काही "मेड फॉर इच अदर." म्हणजे त्यांना न्याहारीसाठी पाणी हवे होते तर.... मी मोठे पाण्याचे तांब्याभांडे त्यांच्यासमोर ठेवले. तिने भाड्यात पाणी ओतून त्याच्यासमोर ठेवले.

मी तिला तिचे नाव विचारले, "पार्वती पण पारू म्हणतात". तिला हसत बोलण्याची किंवा बोलताना हसायची सवय असावी. मी न विचारताच ती म्हणाली, "आणि याच नाव मल्लप्पा" हसतच तिने सांगितले. हसताना तिची दंतपक्ती विशेष चमकायची. त्याचे नाव सांगताना ती किंचित लाजल्यासारखी वाटली.

क्षण दोन क्षण मी तिथेच रेंगाळले. पारूने फडक्यात असलेल्या शिदोरीत भाकरीची चळत आणि वाटलेल्या लाल मिरच्यांची चटणी (ठेचा) आणि कांदा होता. तिने त्याला सुरुवात करायला सांगितले. पण तो थांबला. त्याने माझ्याकडे बघितले.



Marathe Pratishthan

माझ्या समोर ते जेवणार नाहीत हे माझ्या लक्षात आले. मी दिवाणखान्यात येऊन परत सोफ्यावर बसले.

त्यांची न्याहारी संपली असेल असे वाटून मी पुन्हा स्वयंपाकघरात डोकावले. उरलेली एक भाकरी ती त्याला खाण्याचा आग्रह करीत होती आणि तो ती भाकरी तिलाच देत होता.

मी तशीच मागे परतले. दूरदर्शन चालू केले. पण माझे कार्यक्रमाकडे लक्ष लागले नाही. माझ्या मनात त्या जोडप्यांचा विचार घोळत होता. काबाडकष्टाचे जीवन किती आनंदाने जगत होती ती. काम करतानाही त्यांना प्रेमळ सहवासामुळे ते कष्टाचे वाटत नव्हते. किती सुखी जोडपे होते ते ! रात्रंदिवस अेकमेकांच्या प्रेमळ सहवासात. मला त्यांचा हेवा वाटला.

.... तासाभराने दरवाजाची बेल वाजली, मी दार ऊघडले. समोरच्या माणसाने दुरुस्तीचे काम चालू झाले का, असे विचारले.

"होय, आपण मुकादम ना?" मी विचारले.

त्याने होकारार्थी मान हालवली.

मी त्याला स्वयंपाकघरात नेले. पारू आणि मल्लप्पाचे गवंडी काम चालू होते. मुकादम रामण्णाने त्यांना हुकमी आवाजात काम लवकर करण्यास सांगितले व जराही वेळ फुकट घालवू नका असे बजावले. चार दिवसात पुरे झाले पाहिजे, असे दरडावून तिथेच तो खूरमांडी घालून बसला. त्याने बिडी शिलगावली आणि तिचे झुरके घेऊ लागला.

मी पुन्हा दिवाणखान्यात आले. आरामखुर्चीत बसले. स्वैयंपाकघरातून गवंडीकामाचे आवाज आणि मधूनच मुकादमने दिलेल्या सूचना ऐकू येत होत्या.

संध्याकाळी पाचच्या सुमारास प्रथम मुकादम ब्लॉकमधून बाहेर पडला. जाताजाता त्याने मला सांगितले. "बाईसाहेब, त्यांच्या कामावर लक्ष ठेवत जा. काम सोडून गप्पा मारण्याची त्यांची सवयं आहे. चार दिवसांच्या कामाला चौदा दिवस लावतात. त्यांना रोजंदारी मिळते पण तुम्हा आम्हाला नुकसान सोसावे लागते."

मी त्याला थांबवून विचारले "वस्तू बिस्तूची चोरी नाही ना करणार ? आमच्याकडे सगळे उघड्यावर असते."

"नाही बाईसाहेब, ते विश्वासू आहेत. तुमच्याघरची काडीसुद्धा नेणार नाहीत. पण कामात टंगळमंगळ फार करतात" आणि तो निघून गेला.

.... माझा जीव भांड्यात पडला. चोरीची शक्यता नसल्याने सारखे लक्ष ठेवण्याची गरज नाही. करीनात का टंगळमंगळ, आम्हाला तर करारानुसार ठरलेलीच रक्कम द्यायची. चार दिवस अधिक काम रेंगाळत राहिल्यास काय फरक पडणार आहे !

तासाभराने पारू आणि मल्लप्पाची जोडी त्यादिवसाचे काम संपवून परतायला निघाली. जाताना पारू हसत हसत म्हणाली, "आमच सामान इथंच ठेवलाय, चालेल ना? कोणी उसक पासक नाही ना करणार ?"

"कोणी हात लावणार नाही, राहू द्यात तिथे सामान", मी तिला सांगितले आणि दार लावून घेतले.

मनात आलं, ऊसक पासक करायला इथ आहे तरी कोण ? हे सकाळी बाहेर जाणार ते रात्रीच परतणार.

.... मुकादम म्हणाला ते खरेच होते. चार दिवसात आटपेल असे सांगितलेले काम चौदा दिवस लांबले. पण त्यामुळे माझे काहीच नुकसान होणारे नव्हते. संपूर्ण काम झाल्यानंतर मुकादमाला आम्ही एकदमच पैसे द्यायचे ठरले होते. चार दिवसात आटोपले असते तरी तितकेच पैसे आणि चौदा दिवस लागले असले तरी तितकेच पैसे. उलट गवंडी जोडप्याच्या वावरामुळे माझ्या मनाला एक वेगळाच विरंगुळा वाटायचा. नेहमी दूरदर्शन बघणे, कथा, कांदबऱ्या, सिनेमा आणि फॅशनसंबंधीची मासिके चाळणे हाच रिकामपणाचा ऊद्योग चालयाचा. ब्लॉक संस्कृतीमुळे शेजाऱ्यांशी संबंध नाही.

पारू आणि मल्लप्पा यांचे काम कसे चालते आहे हे पाहायचे; कंत्राटदार रामण्णाने ती जबाबदारी माझ्यावर टाकली होती पण मी मात्र काही तशी देखरेख करीत नव्हते. माझ्या काही ते स्वभावात नव्हते. सोफ्यावरचे सुखासन सोडून आतल्या खोल्यांमध्ये वारंवार डोकावयाचा मला उत्साह नव्हता. पण त्यांच्या हालचालीचा अंदाज बसल्या जागी घेत होते. त्यांच्या कामाच्या हालचालींचा कानोसा मात्र मी घेत होते. तशी ती माझी सवयच झाली. कधी त्यांच्या हसण्याचा, खिदळण्याचा आवाज ऐकू आला की, पारू पानाला चुना लावीत असणार आणि मल्लप्पा हातावर तंबाखू मळीत असणार असे समजायचे. मल्लप्पाला गाणे गुणगुणण्याची सवय होती. एकदा मी सहज डोकावले तर त्याच्या वाट्याचे काम आटोपून तो कसले तरी गाणे गुणगुणत होता आणि पारुची काम आटपण्याची लगबग चालू होती.

.... एके दिवशी त्यांची न्याहारी आटोपल्यावर बराच वेळ त्यांच्या कामाचा कसलाच आवाज आला नाही. एकदा वाटले काम चालू आहे की नाही ते जाऊन बघून यावे पण दुसऱ्याच क्षणी मनात विचार आला की न्याहारीनंतर ते दोघे थोडी विश्रांती घेत असावेत. कशाला त्यांच्या आरामात विघ्न आणायचे? आणखी काही वेळ तशाच शांततेत गेला. त्यांच्या कामाची कसलीच हालचाल ऐकू आली नाही.

..... माझी चहाची वेळ झाली. चहा करण्यासाठी स्वैयंपाकघरात जायचे म्हणजे



Marathi Pratishthan

त्यांच्या काम चालू असलेल्या खोलीतूनच जायचे. तेथून जाताना मल्लप्पा झोपलेला दिसला आणि पारू हळूवार हाताने त्याचे डोके चेपीत होती. माझी चाहुल लागताच ती म्हणाली. "ह्यांचं डोकं खूप चढलाय, तुमच्याकडे बाम आहे का ? थोडा देता का चोळायला ?" माझ्याकडे न पाहाताच तिने विचारले.

"बाम कशाला" मी डिस्परीनची गोळी देते आणि लगेच चहाही देते. डोके दुखायचे थांबेल", मी म्हटले...... प्रथम डिस्परीनची गोळी दिली आणि पाठोपाठ चहाही दिला.

मी पुन्हा दिवाणखान्यातील सोफ्यावर येऊन मासिके चाळू लागले.

थोडा वेळ तसाच शांततेत गेला. आतल्या खोलीत काम चालू झाल्याची काहीच हालचाल ऐकू आली नाही.

आतल्या खोलीत जाऊन पाहावे असे वाटले. परंतु तितक्यात ते दोघेही बाहेर आले.

पारू म्हणाली, "यास बरे वाटत नाही, काम व्हणार नाही म्हणून आम्ही लवकर जातो."

काही वेळाने रामण्णा आला. येतायेताच त्याने मला विचारले, "काम करतायत की नाही दोघं ?"

"मल्लप्पाची तब्येत बिघडल्यामुळे ते आज लौकर गेले," मी सांगितले.

"असं ?" रामण्णा नाराजीच्या स्वरात स्वत:शीच पुटपुटला.

त्याने एकदा किती काम झाले याचा अंदाज घेतला आणि तो परतला.

.... दुसरे दिवशी मल्लप्पा आणि पारू दोघेही कामावर आले नाहीत.

..... मुकादम रामण्णा मात्र चार वाजता आला. दोघेही कामावर आले नसल्याचे कळल्याने तो रागावलेला दिसला. घुश्श्यातच त्याने विचारले, "पारू सुद्धा आली नाही ?"

मल्लप्पा बीमार आहे, पण पारूला यायला सांगितले होते. तिला टाईल्स पॉलिशपेपरने साफ करायला सांगितल्या होत्या. प्लॅस्टर केलेल्या भिंतीवर पाणी मारायलाही सांगितले होते." रामण्णाला पारूच्या कामचुकारपणा बद्दल बराच राग आलेला दिसला. बिडी ओढण्यासाठी तोंडात धरलेली बिडी त्याने तशीच न पेटवता खिशात घातली. मला म्हणाला, "बाईसाहब उद्या मात्र तुम्ही त्यांच्या कामावर जातीने लक्ष ठेवा. काम तीन दिवसात पुरे करायचे आहे. त्यांना तगादा लावल्याशिवाय ती कामे करायची नाहीत."

मला असे बजावून तो निघून गेला.

.... दुसरे दिवशी तिघेही कामावर एकत्रच आले. रामण्णाने त्यांना काम करण्यास सांगितले आणि तेथेच तो बिडी फुंकत बसला.

मल्लप्पा आणि पारू वेगाने कामास लागले. रामण्णाच्या देखरेखीमुळे काम भराभर पूर्ण होऊ लागले. रामण्णाने दुपारची न्याहरी त्यांच्याबरोबरच घेतली. अंधार पडेपर्यंत काम चालू होते आणि नंतर तिघेही एकदमच गेले. दुसरे दिवशीही असेच जलद काम झाले.

तिसरे दिवशी काम आटपत आले. मल्लप्पा आणि पारू न्याहरी करण्यासाठी बसली आणि रामण्णा मुकादम चार वाजता येतो असे सांगून त्याच्या दुसऱ्या कामावर गेला.

दुपारी चार वाजता रामण्णा मुकादमाने पूर्वी ठरल्यानुसार कामाचे पैसे माझ्याकडून घेतले आणि समाधानात बिडी पेटवून तो गॅलरीत बसला. मल्लप्पा आणि पारूने सामानाची आवराआवर केली. मी त्यांना चहा घेण्यासाठी थांबवले.

माझ्या मनात आले की मल्लप्पा आणि पारूला काहीतरी बक्षिसी द्यावी. पारूला ब्लाऊजपीस द्यावा आणि मल्लप्पाला शर्टचे कापड द्यावे. मी कपाटातून ब्लाऊजपीस आणि शर्टचे कापड काढले.

पद्धतीनुसार कुंकू लावून ब्लाऊजपीस पारूच्या हाती दिला.

"आणि हा शर्टपीस तुझ्या नवऱ्यासाठी." असे म्हणून मी शर्टपीस बाजूला उभ्या असलेल्या मल्लप्पाला देणार इतक्यात पारू म्हणाली, "थांबा".

झटकन तिने गॅलरीत बसलेल्या रामण्णाला आत बोलविले. ती त्याला म्हणाली "बाईसाबेत तुम्हाला शर्टचे कापड देताहेत".

....मल्लप्पा दारातून बाहेर पडला.

.... आणि रामण्णा आत आला. पारू म्हणाली, "यांना शर्टपीस द्या."

मी गोंधळलेल्या स्थितीत शर्टपीस रामण्णाला दिला. पारू आणि रामण्णा बरोबरच बाहेर पडले!

.... मी दारातून त्याच्याकडे बघितलं. मल्लप्पा एकटाच पुढे गेलेला होता. पारू आणि रामण्णा जोडीने रमतगमत चालले होते!

----------

**भाऊचा धक्का**

*कित्येक काटे एकदम फिरवणे कसे जमते समजत नाही.*
*त्यांच्या घड्याळ्यात किती वाजले*
*कधीच कुणाला उमजत नाही.*

... भाऊ मराठे (श्री. सदानंद विष्णु मराठे) (पृ.क्र.५०७)
दादर, मुंबई. फोन:९८२१३६६२५२ / २४४४८६४८



Marathe Pratishthan

# पश्चिमेचा गंगासागर - स्तंभेश्वर

लेखक - श्री. सदाशिव बळवंत मराठे (बडोदे) पृ.३८०

आपल्या प्राचिन-पौराणिक कथा वाचल्यावर आपल्याला देवा-दिकांच्या अनेक कथा ऐकायला-वाचायला मिळतात. त्यानुसार देवाधिदेव महादेवाच्या अनेक चमत्कारिक पण उपदेशपूर्ण कथा आपण वाचल्या आहेत. तशीच एक पौराणिक सत्यकथा गुजरात मधील भरुच जिल्हातील स्तंभेश्वर शिवस्थानाची आपल्याला जाणावयास हवी. शिवलींग मूळभूतरुपे ब्रम्हदेवाची प्रतिकृति आहे. प्राचिन काळापासून समस्त विश्वात शिवलींगाची पूजा, उपासना आणि आराधना प्रचलीत आहे. शिवलींग समस्त देवांचे श्रद्धास्थान म्हटले आहे.

गुजरातमध्ये भरुच जिल्हयात जंबूसर तालुक्यात कावी-कंबोई नावाचे गांव आहे. गांव सुमुद्राच्या खाडीचे किनाऱ्यावर वसलेले आहे. गावाच्या आणि खाडीच्या किनाऱ्याच्या मध्यावर एक अद्धितीय असे हल्ली हल्लीच जार्णोद्धार केलेल प्राचीन शिवालय आहे. शिवालय स्तंभेश्वर नावाने प्रसिद्ध आहे। येथे शिवलींगाला खाडीतून येणाऱ्या सागराच्या लाटा दिवसातून दोन वेळा अभिषेक करतात. खंभातच्या आखातात आलेल्या ह्या महादेवाच्या दर्शनास येणाऱ्या भक्तांचा प्रवाह सतत चालू असतो. महाशिवरात्रीचे दिवशी ह्या शिवलींगावर १००८ लिटर दूध आणि उसाच्या रसाचा अभिषेक केला जातो. ह्या तीर्थाच्या प्राचिनतेबद्दल म्हटले जाते कि ह्याची स्थापना शिवपुत्र कार्तिक स्वामीने केली होती. पौराणिक मान्यतेनुसार कुमार कार्तिकेयाने तारकासुराचा नाश करुन शिवभक्ताला मारण्याचे पापक्षालन करण्याकरीता ह्या शिवलींगाची स्थापना केली आणि प्रत्यक्ष ब्रह्मदेवाने कार्तिकेयाला हे शिवलींग दिले होते.

कुमार कार्तिकेयाने तारकासुराला मारल्याच्या आनंद-खुशाली दर्शविण्यासाठी इंद्रासह सर्व देवांनी तेथे सुशोभित सोन्याचा स्तंभ दिला होता त्यामुळे ह्या शिवलींगाला "स्तंभेश्वर महादेव" असे नामकरण प्राप्त झाले. हे स्थळ पितृतर्पण करण्याकरिता प्रसिद्ध आहे. येथे येणाऱ्या भक्तांना गंगास्नान केल्याचे पुण्य प्राप्त होते, कारण ह्या ठिकाणी खंभातच्या आखाताचा अरबी समुद्र आणि आठ नद्यांचा संगम झाला आहे. मही, वात्रक, शेठी, मेश्वो, खारी, चंद्रभागा, साबरमती, आणि हाथमती ह्या नद्यांचा समावेश होतो. दिवसातून दोन वेळा सागराद्वारे शिवलींगावर होणारा अभिषेक-स्नान प्रत्यक्ष पहाण्यासाठी असंख्य भक्तांना गाभाऱ्याचे वरचे बाजूस उभे राहून सागराच्या लाटांचा अभिषेक पहाण्याचा आनंद व अनुभव खूप आगळा आहे. जस जसे संपूर्ण शिवलिंग पाण्यात बुडते तस तसे सागराच्या लाटा पुन: सागराकडे परत जाताना दिसतात. पुन्हा शिवलिंगाची पूजा–अर्चा सुरु होते. बारा ज्योतिर्लिंगाचे दर्शना बरोबर व पूर्वेकडिल गंगासागराचे दर्शनासह स्तंभेश्वराच्या दर्शनानेही मनाला खूप स्वास्थ्य व समाधानयुक्त आनंद वाटतो.

**सदाशिव बळवंत मराठे (पृ.३८०)**
"अन्नपूर्णा" शास्त्री पोळ, कोठी चार रस्ता,
मराठे वाडा, बडोदे - ३९०००१.
फोन नं. : ०२६५-२४२३०५५

## साभार पोच

ईशावास्योपानिषद भावार्थ : लेखक : श्री. प्रभाकर सिताराम मराठे (पृ.३२७)
केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, प्रथमावृत्ती,
पृष्ठसंख्या - ४०, किंमत - २५ रुपये फक्त
संपर्क दूरध्वनी : ०२२-२६६७२२०५ भ्रमणध्वनी :

## चित्पावन संघाचे अखिल राष्ट्रीय अधिवेशन

**दि.२७ व २८ डिसेंबर २०१४ ला आयोजित करण्यात येणार आहे.**

**अधिक माहितीसाठी संपर्क :**

श्री. विजय मराठे - ९४२३०११९४९
श्री. श्रीकांत केळकर - ९८२२८४५२३९,
(अध्यक्ष-CFEN) Email : cfen.president@gmail.com
श्री. मिलींद दाते - ९४२२५०२४७२
Email milindrdate@gmail.com



Marathe Pratishthan

# "गंध"

आज आपण गंधांच्या दुनीयेत डोकावू यात !! नवजात शिशुला त्याची आई तेल लावून छानपैकी आंघोळ घालते, तो गंध अपूर्व असाच. ह्याची परीणीती ते बाळ त्याच्या चेहऱ्यावरील निर्मल हास्य जगाला देते यात होय!!

आपल्या शालेय जीवनात नव्या कोऱ्या पुस्तकांचा वह्यांचा तो परीचीत गंध ! तोही हवा हवासा आणि मनाला भावणाराच की हो ।।

पावसाळ्यात विशेषत: पहील्या सरीचा मातीवर शिडकावा होताच, जो गंध आसमंतात दरवळतो त्याची सर चार्ली, डेनीमच्या गंधाला पण वेडावून टाकेल नाही ?

एखादया मंदीराजवळून जातांना त्यातून जो उदबत्ती, धुप, फुले, तेल /तुप मिश्रीत गंध येतो. तो एखाद्या नास्तीकाला देखील त्या "दिव्य" शक्तीपुढे नतमस्तक करील.

एखादया छोट्याश्या खेडेगावात गेल्यावर तेथील एखाद्या झोपडीसमोरील, शेणाने सारवलेल्या अंगणाचा गंध ! कारभारीण बाई चुलीवर भाजत असलेल्या खमंग भाकरीचा गंध, नक्कीच मनात घर करुन राहतो नाही का??

श्रावण महिन्यात, आमच्या नाशकात, फुल बाजार म्हणून एक परीसर आहे (जून्या नाशकात) तिथे भल्या सकाळी नुस्ती एक चक्कर टाकून आले की मन वेडावून जाईल अशी गंधाची आणि रंगांची उधळण असते. नाना प्रकारची फुले, त्यांचे नानाविध रंग आणि सुवास आसमंतात भरलेले असतात. तो गंध किती तरी वेळ मनात घर करुन राहतो.

तिथून परत येतांना रवीवार कारंजावर एक चहा मिसळ ची गाडी आहे!
त्याचाही गंध काही औरच आहे! बरे का!! नाकात सण्णकन जातो आणि त्या गरमागरम मिसळ चहाचा मोह जो टाळेल तो "मनुष्य" नाहीच!!

एखाद्या घरात तरुण मुलगी, वयात आलेली। तिची घरातील ती लगबग । नटायची मुरडायची आवड काही औरच।
(आई बाबांना शक्यतोवर चुकवून उत्तम उत्तम सेंट / परफ्युम, लिपस्टीकस इ. ची जमवाजमव सुरु असते) अशा तरुणाईचा घरातील वावर, तो उत्साह, ती जाणीव वेगळीच।

खंडाळा, लोणावळा, माथेरान ह्या हिल स्टेशनच्या ठिकाणी हिरवाईचा मखमली गालीचा असतो.
त्याचा तर गंध संपूच नये असे वाटते.
खरचं ! असा गंध एका काचेच्या बाटलीत भरून घेऊन नंतर वापरता आला असता तर ?
पण ते शक्य नाही ।।
कारण गंधांचा खजीना असलेला निसर्ग म्हणतो: अरे नादान माणसा, तुला माझा आनंद प्राप्त करुन घ्यायचा असेल तर मी तुजकडे नाही येणार. तु मजकडे यावेस ! दोन घटका ! माझे हे ऐश्वर्य, सौंदर्य त्याला इजा न होईल इतपत् घ्यावेस आणि परत तुझ्या कामास लागावे ।

आहे की नाही ही गंधभरी दुनीया न्यारी ।।

**श्री. संजय अनंत मराठे (नाशीक)**
मो. : ९८२२६९५३७१
फोन : ०२५३-२३४३७०४
निवास : प्लॅट क्र.८, ३ रा मजला,
रिजेंसी टॉवर्स, शंकर नगर, गंगापूर रोड,
नाशिक - ४२२०१३

## मानसन्मान

"कॉटन किंग" प्रदीप मराठे - घराणे ५४ वे - वेंगुर्ले (पृ. ४२३) मराठी व्यावसायिक ऊद्योजक व्यापारी मित्र मंडळाचा ३३ व्या वर्धापनदिन कार्यक्रमात "कॉटन किंग" प्रा. लि. चे चेअरमन प्रदीप मराठे यांचा महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री. सुनील तटकरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

मराठे प्रतिष्ठान द्वारा श्री प्रदीप मराठे यांचे हार्दिक अभिनंदन (हितगुजच्या ७५ व्या अमृत महोत्सवी अंकात सप्टेंबर २००८ श्रीनिवास गोपाळ मराठे यांचा अेक यशस्वी ऊद्योजक कॉटन किंग प्रदीप मराठे हा मुलाखतीचा लेख प्रकाशित झाला होता)

Marathe Pratishthan

# मत्सर - षड्रिपु

माझ्यासोबत काम करणारी कार्यकर्ती आहे. एरवी चांगली काम करणारी. पण परिस्थितीने गरीब, तसे आमचे सर्वच कार्यकर्ते गरीब. ते सर्वजण मनापासून काम करतात. पण संस्थाही गरीब. देणग्यांवर चालणारी. निश्चित उत्पन्नाचे साधन नाही. आम्ही कार्यकर्त्यांना मानधन देतो. आमच्याकडे वेतनश्रेणी नाही. पगार, भत्ता वगैरे प्रकार नाहीत. सारे स्वयंसेवी. सर्वांनाच मानधन. ते काही पुरेसे नसते. त्यामुळे सगळा मामला गरिबीचाच.

पैशांनी गरीब असलं तरी मनानी श्रीमंत का असू नये ? पण तसं होत नाही. एखाद्या कार्यकर्तीचा नवरा चांगला कमावणारा असेल किंवा एखादीचे वडिल तिला आर्थिक मदत करत असतील. त्यामुळे त्या कार्यकर्तीच्या अंगावर सणासुदीला भारी साडी असते. कार्यालयातही ती ती साडी नेसून येते. ते पाहिलं की, ही कार्यकर्ती बिथरते. तिच्या वागण्या-बोलण्यात फरक पडतो. ती टोमणे मारते. तिची देहबोली बदलते. असं का होतं ? तिला स्वत:ला भारी साडी घेता येत नाही. तिचा मत्सर जागा होतो.

मी शाळेत मास्तरकी करत असताना एकदा एक मुलगा त्याचा रेनकोट घेऊन माझ्याकडे आला. तो म्हणाला ' सर, हा रेनकोट कालच वडिलांनी आणला. तर त्या ह्याने त्याच्यावर ब्लेड मारली. बघा, सारा रेनकोट फाटलाच.' मी त्या ब्लेड मारणाऱ्या मुलाला बोलावले. विचारपूस केली. तर तो अतिशय उद्धटपणे म्हणाला, 'हो मी मारली ब्लेड. पुन्हा पुन्हा मारीन' आणि तो ढसाढसा रडू लागला. त्या मुलाला नवा रेनकोट तीन वर्षात मिळाला नव्हता.

बायकांची तर भांडणं नेहमीच चालू असतात. 'अहो, या दिवाळीला त्यांच्याकडे मोठ्या स्क्रीनचा टी.व्ही. आणलाय. आपण अगदी तसाच टी.व्ही. घेऊ या' किंवा 'त्या ह्यांच्याकडे नवीन फ्रीज घेतलाय. आपल्याला पण नवीन फ्रीज घ्यायला पाहिजे. आपला फ्रीज म्हणजे डबडं झालंय अगदी ' हे असे संवाद सगळ्या घरात चालू असतात.

टी.व्ही. वरुन आठवलं, आता घरोघर टी.व्ही. झालेत. त्यामुळे नेमका काय फरक पडला ? पूर्वी गरिबी नव्हती का ? होती का. पण सगळेच गरीब. अमूक एक श्रीमंत आहे, म्हणजे काय आहे, हे कळायला मार्ग नव्हता. खेड्यात अजूनही श्रीमंत शेतकरी चार चौघांसारखा धोतर, शर्ट, टोपी या पोषाखात वावरतो. त्याची श्रीमंती कळून येत नाही. पण टी.व्ही. मुळं, त्यावर दाखवण्यात येणाऱ्या जाहिरातींमुळे व सीरियल्समुळे श्रीमंती म्हणजे काय, हे सामान्यांना कळायला लागले. टी.व्ही. फ्रीज, मिक्सर, ग्राइंडर, फर्निचर, भिंतीचे रंग, ग्रोसरी.... सगळं कसं चकचकीत. त्यामुळे 'नाही रे' वर्गाला आपल्याकडे काय नाही ते कळू लागले. 'हे माझ्याकडे नाही, ते मला का नको ?' सिनेमे देखील घरात घुसले. ह्या सिनेमात प्रचण्ड हिंसा असते. छीनाझपटी केल्यावाचून आपल्याला काही मिळणार नाही, हा संदेशही दिला जातो. त्यातून समाजात हिंसा वाढत जाते. या सगळ्याच्या मुळाशी आहे मत्सर.

अर्थात मत्सर गरिबांमध्येच असतो व गरीबीमुळे मत्सर वाढतो असंही नाही. उच्च मध्यम वर्गीयात व श्रीमंतांतही मत्सर असतो. तो स्वभाव आहे, 'माझ्याकडे फियाट आहे, पण त्याच्याकडे शेवरोलेट आहे. मला पण तशी गाडी घेतलीच पाहिजे.' हा विचार असतोच. दुसऱ्याची बायको सुंदर आहे, याचाही अनेकांना मत्सर असतो. दुसऱ्यांची मुले खूप हुषार आहेत, ह्याचाही मत्सर असतो. शेवटी हा स्वभाव आहे.

मत्सर प्रथम आपले मन जाळते. मग दुसऱ्याला बेचिराख करण्यासाठी तडफडते. मद असेल तर मत्सर कापरासारखा पेट घेतो. मत्सराने पेटून उठलेला माणूस क्रोधाने विवेकहीन होतो व त्यातून सर्वनाश ओढवतो.

मद त्याज्य तसा मत्सरही त्याज्यच. हे दोघेही खऱ्या अर्थाने रिपु आहेत. शत्रु आहेत. या शत्रूंना आपल्यापाशी थारा देता कामा नये.

**श्री. विलास चाफेकर**

**प्रेषक : श्री. प्रभाकर दामोदर मराठे**

**(पृ.१२०)**



Marathe Pratishthan

# कोऱ्या मनावरचा कोरीगड

खूप दिवसांपासून प्रलंबित असा कोरीगडचा ट्रेक रविवार सकाळी मी आणि सचिन ठरल्याप्रमाणे दादर स्टेशन गाठले. ठाणे, कल्याण अशी स्थानके आणि मग उजवीकडे चंदेरी, पेब माथेरान अशी रांग मागे टाकत गाडी पुढे जात होती, खंडाळा घाट पार करुन आम्ही लोणावळा आले. तेव्हा वातावरणात एकदम बदल झालेला जाणवला. मुंबईपेक्षा थंड आणि आकाश ढगाळ होते. तडक बस डेपो गाठला, भांबुर्डेकडे जाणारी बस आमची आतुरतेने वाट पाहत होती. बसमध्ये चढलो आणि बस निघाली. बरोबर एक दुसरा ग्रुपदेखील होता जो घुसळखांब उतरुन तुंगकडे निघून गेला. आम्ही तिघे पेठ शहापूरला उतरलो.

गावात चहा घेतला आणि भुरभुर पाऊस सुरु झाला. आम्ही राजमार्गाने कोरीगडकडे प्रयाण केलं. कोरीगड तसा सोपा आणि सरळसोट असा किल्ला, पण एका हुशार व्यक्तीने दिशादर्शक उलटा करुन टाकला आणि आम्ही जरा पुढे गेलो. तशी वाट चुकायची येथे बिलकुल भीती नाही. किल्ला चढताना बिलकुल दमचाक होत नाही. गणेश मंदिर आणि गणेश टोक पार करुन गणेश दरवाजा कधी आला हे कळलेच नाही. विनासायास आणि विनादमछाक होता किल्ला गाठला होता, किल्ल्याची तटबंदी अजून शाबूत आहे त्यावरून प्रवास करीत एकदोन असे बरेच बुरुज पाहिले. एका बुरुजावर काही परदेशी पर्यटक आले होते. मनाला जरा बरे वाटले की, किल्ल्याची थोडी का होईना, त्यांनादेखील ओढ आहे ।

आता मात्र पावसाने त्याचा तोफ़खाना चालू केला आणि संगतीला वाऱ्याने आमची भंबेरी उडवली, दाट धुक्यामुळे काही टप्पा सोडला तर काही दिसत नव्हते. कोराईदेवीचे दर्शन घेऊन लक्ष्मी तोफ पाहिली आणि आंबवणे दरवाजा गाठला, पण पाऊस थांबला नव्हता. आंबवणे दरवाजाला धबधब्याचे रुप आले होते आणि येथून खाली उतरणे म्हणजे "आ बैल मुझे मार" अशी अवस्था. शेवटी आम्ही पेठ शहापूर गाठावे असे सर्वानुमते ठरले आणि गणेश दरवाजा गाठून खाली निघालो. मध्ये एका ठिकाणी बरीच गर्दी जमली होती. जाऊन पाहिले तर चिमण्यासारख्या पक्ष्यांची अंडी आणि घरटे जमिनीत बांधलेले दिसले. हा नवीनच चमत्कार पहिला गेला होता. कारण पक्षी घरटे उंच ठिकाणी किंवा झाडावर आणि सुरक्षित ठिकाणी बांधतात ही गोष्ट कॅमेऱ्यात बंदिस्त करुन सिमेंटच्या पायऱ्या उतरुन मातीच्या रस्त्याने खाली आलो तोपर्यंत बस निघून गेली होती. गावात चौकशी केली असता कळले की, सालेत गावाजवळीत ओढ्याला पूर होता आणि बस वेळेआधीच परत गेली.

आता जे मिळेल ते वाहन गाठून लोणावळा गाठणे भाग होते पण कोणी लिफ्ट देईना. शेवटी एक टेम्पोवाला तयार झाला. आम्हाला परतीची डेक्कन पकडायची होती. पण कसले काय! त्या टेम्पोवाल्याने ५ वाजता स्टेशनपासून दूर सोडले. आम्ही पायाचा वेग वाढ़वीत बुकिंग ऑफिस गाठले. कारण डेक्कन चुकली होती आणि कोयना चुकली असती तर पुढे एक तास गाडी नाही आणि



उशीर होत गेला असता. यावेळी गृहपाठ चांगला झाला होता. त्यामुळे मी मनोमन सुखावलो होतो. गरमागरम समोसा खाऊन वर चहा आणि कर्जतपर्यंत उभ्याने प्रवास करीत दादर गाठले तेव्हा चातुर्मासातील कहाणीच्या दोन ओळी आठवल्या. फक्त त्यात थोडा बदल होता की, कोरीगडची कहाणी कोयनागत येऊन सफल संपन्न ।।


श्री. निरंजन प्र. मराठे (पृ.१२०)

मो.:९८२०७३४८८४


## स्वातंत्र्यवीर सावरकर

जन्मजात जातिभेदाच्या विरुद्ध मी आहे. कोणत्याही जातीत जन्मलेल्या मनुष्याचे उत्कर्षास त्याची जात आड येऊन नये. मी चित्पावन आहे याचा मला अभिमान आहे. चित्पावनांची उज्वल परंपरा लक्षात आणा आणि प्राप्त परिस्थितीमुळे त्यांना बौद्धिक व आर्थिक दौर्बल्य येत चालले आहे, ते संघटित प्रयत्नांनी घालविण्याचा प्रयत्न करा.

...स्वातंत्र्यवीर
विनायक दामोदर सावरकर




Marathe Pratishthan

# सावरकरांनी कधीही क्षमायाचना केली नाही

रणजीत सावरकर

स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी आपले संपूर्ण आयुष्यच देशासाठी व्यतीत केले. ज्या काळात वसाहतीचे स्वातंत्र्य मागण्यास देखील भारतीय नेते कचरत होते, तेव्हा संपूर्ण स्वातंत्र्य हेच ध्येय असल्याचे प्रकटपणे घोषित करून "स्वांतंत्र्यलक्ष्मी की जय" ही घोषणा प्रचारात आणणारे सावरकरच होते. अंदमानमध्ये यमयातना भोगणाऱ्या या अलौकिक देशभक्ताची स्वतंत्र भारतात मात्र सदैव उपेक्षाच झाली. हेही कमीच झाले असे वाटून काही महाभागांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांनी ब्रिटिश सरकारची माफी मागितली, असा धादांत खोटा आणि अपमानास्पद प्रचार सुरु केला. वस्तुत: स्वा. सावरकरांनी कधीही क्षमायाचना केलेली नाही. याबद्दल कुठलाही पुरावा नाही. पुरावा म्हणून दाखविण्यात येणारे सप्टेंबर १९९४ चे पत्र संपूर्ण वाचले तर हे लक्षात येईल, यात दया, क्षमा अथवा माफी असा शब्ददेखील नाही.

१९०९ मध्ये बर्लिनमधून प्रसिद्ध होणाऱ्या "तलवार" नावाच्या क्रांतिकारकांनी चालवलेल्या मुखपत्रात सावरकरांनी एका लेखात लिहिले होते "थोड्याच वर्षात इंग्लंड-जर्मन असे युद्ध सुरु होईल. भारताला स्वातंत्र्य मिळवता येईल. क्रांतिकारकांनी आतापासून तयारी सुरु करायला हवी, अशी सुवर्णसंधी शतकातून एखादी मिळते, पुन:पुन्हा नाही." या योजनेनुसारच १९१४ मध्ये अभिनव भारताच्या क्रांतिकारकांनी अन्य क्रांतिकारकांच्या मदतीने युरोपीय हिंदी स्वातंत्र्य समिति (बर्लिन-समिती) स्थापन केली. बर्लिन-समितीला एका कराराद्वारे हिन्दुस्थान स्वतंत्र झाल्यानंतर परतफेडीच्या अटीवर जर्मन सरकारने अर्थसाहाय्यही केले. या समितीनेच काबूलमध्ये भारताचे पहिले निर्वासित सरकार बनविले आणि गदर कटातही सक्रिय सहयोग दिला.

या पार्श्वभूमीवर मिहिलेले स्वा.सावरकरांचे पत्र मुळातूनच संपूर्णपणे वाचण्यासारखे आहे. महायुद्धाच्या कोंडीत सापडलेल्या इंग्रजांकडे त्यांनी "देशाला वसाहतीचे स्वातंत्र्य देऊन राजबंदिवानांना सोडल्यास भारतीय क्रांतिकारक शस्त्रसंधीसाठी तयार होतील". असा प्रस्ताव अत्यंत मुत्सद्देगिरीने मांडला होता. याच पत्रातील "वाटले तर मला न सोडता इतर क्रांतिकारकांना सोडण्यात यावे" हे वाक्य यात सावरकरांचा कुठलाही वैयक्तिक स्वार्थ नसल्याचेही स्पष्ट करते.

ब्रिटिश कायद्यानुसार अंदमानमध्ये कैद्यांना सहा महिन्यानंतर बाहेर काम करण्यासाठी पाठवीत असता. कैदी जरा शिकलेला असला तर त्याला लिपिकाचे काम देत, परंतु सुशिक्षित क्रांतिकारकांना मात्र कोलूला जोडत असत. दीड वर्षांनंतर सावरकरांनी नियमाप्रमाणे इतर कैद्यांप्रमाणे त्यांनाही कामासाठी तुरुंगाबाहेर पाठविण्यात यावे, असे निवेदन दिले. (या निवेदनाचा हेतुपुर्वक चुकीचा अर्थ घेऊन सावरकरांनी दीड वर्षातच सुटकेसाठी अर्ज करणे सुरु केले असा खोडसाळ प्रचार करण्यात येतो) या निवेदनावर सरकारने उत्तर दिले की, "तुमचा पूर्वेतिहास भयंकर असल्याकारणाने तुम्हाला सवलत देता येत नाही." क्रांतिकारकांनी आपला संघर्ष तीव्र केल्यावर माघार घेत सरकारने क्रांतिकारकांनाही कामासाठी बाहेर धाडण्याची मागणी मान्य केली. पुढे स्वत:चे अन्न शिजविण्याची परवानगीही देण्यात आली. बहुसंख्य क्रांतिकारकांना ३-४ वर्षातच भारतात परत धाडण्यात आले. परंतु सावरकरांना यातील एकही सवलत न देता, सतत दहा वर्षे कोठडीत बंद करुन ठेवण्यात आले. ते शेवटचे ३-४ महिने तेल गोदामाचे मुकादम असताना देखील त्यांना रात्री कोठडीबंद करण्यात येत होते. या काळात त्यांना क्षुल्लक अपराधांसाठीही खडा-बेडी (रोज बारा-बारा तास याप्रमाणे ८-१५ दिवस भिंतीशी बेडीत जखडून टांगणे), दंडा-बेडी (१५-१५ दिवस बेडीत हात पाय जखडून ठेवणे), कोलू, एकांत कोठडी अशा असंख्य अमानवी शिक्षांना सामोरे जावे लागले.

केंद्रीय विधिमंडळात विठ्ठलभाई पटेल यांनी सर्वच राजबंद्यांच्या सुटकेची मागणी करणारा ठराव मांडला होता. त्यात सावरकरांचा विशेष उल्लेख होता. २४ फेब्रुवारी १९२० रोजी ग.श्री. खापर्डे यांनी सावरकरांना सोडावे म्हणून बाजू मांडली होती. १९२१ च्या मार्च महिन्यात केंद्रीय विधिमंडळाचे सदस्य के.व्ही. रंगास्वामी यांनी पण सावरकरांना सोडण्याची मागणी केली. या मागणीला नवाब सर बहरामखान आणि हयातखान या दोन सदस्यांनी विरोध केला. ते म्हणाले, "सावरकरांना सोडले तर आगीत तेल ओतल्यासारखे होईल." त्यावर अध्यंगार हे सदस्य म्हणाले की सावरकर बंधूंची हमी मी घेतो.

यादरम्यान सावरकरांच्या



Marathi Pratishthan

सुटकेच्या मागणीपत्रावर सुमारे ८० हजार स्वाक्षऱ्या गोळा केल्या गेल्या. गांधी आणि नेहरू यांनी मात्र त्यावर स्वाक्षरी करण्यास नकार दिला. भारतात अनेक प्रांतांतील वृत्तपत्रांत अंदमानची यमयातना वर्णन करणारे लेख व सावरकरांनी अंदमानातून त्यांचे भाऊ डॉ. ना.दा. सावरकर यांना पाठवलेली पत्रे भाषांतर करुन छापली गेली. सावरकरांच्या सुटकेची मागणी वृत्तपत्रे, नेते व काही ब्रिटिश विचारवंतसुद्धा करत होते. परिणामत: सरकारने अंदमान येथील वसाहत बंद करुन कैदी भारतात परत आणण्याच्या दृष्टीने हालचाली सुरु केल्या. सावरकर बंधू वगळता बहुतेक क्रांतिकारकांना भारतात परत पाठवण्यात आले. अखेरीस १९२१ साली ब्रिटिश सरकारने सावरकर बंधूंना अंदमानातून भारतात आणले. (अर्थात भारतातील तुरुंगातही सावरकर बंधूंचे छळसत्र थांबले नाहीच) यावरुन हेच निर्विवाद सिद्ध होते, की सावरकरांची अंदमानातून झालेली सुटका जनमताच्या व परिस्थितीच्या रेट्याने झाली.

आणि आता नुकताच कोणालाही नाकारता येणार नाही असा निर्विवाद पुरावा पढे आला आहे. तो म्हणजे स्वा.सावरकर याच्या कवितांचे १९२१ मधले हस्तलिखित. अंदमानातून सुटका होण्याच्या काही महिने आधी स्वा. सावरकरांना तेल गोदामावर मुकादाम म्हणून बढती मिळाली होती. त्या काळात त्यांनी कारागृहातील कोरे कागद एकत्र करुन एक वही तयार केली. या वहीच्या आवरणाचा खर्डा कैद्याच्या इतिहास पत्रिका एकमेकांना चिकटवून तयार केला आहे. ही वही दादर येथील स्वा. सावरकर स्मारकात ठेवण्यात आली आहे (रविवार दिनांक ११ ऑगस्ट २०१३ ला स्वा. सावरकर सभागृहात मराठे प्रतिष्ठानची वार्षिक कार्यकारिणीची सभा भरली होती त्यावेळी कुलबांधवांना स्वातंत्र्यवीरांच्या हस्ताक्षरातील ही वही पाहता आली). याच वहीत सावरकरांच्या दोन अत्यंत देशभक्तीवर उर्दू गझला आणि युवकांना क्रांतीचे आवाहन करणारी एक हिंदी कविता आहे. अंदमानमध्ये हालअपेष्टा भोगत असतानाही ते उर्दू शिकले होते. या रचना पर्शियन आणि देवनागरी या दोन्ह लिपित स्वा. सावरकरांच्या हस्ताक्षरात आहेत. या कवितेत युवकांना ब्रिटिश सत्तेविरुद्ध उठावणी करण्याचे आवाहन करताना सावरकर लिहितात.

हन्ता रावण का हे अपना राम वीरवर सेनानी, कर्मयोग का देव है स्वयं कृष्ण सारथी अभिमानी ! भारत तेरे रथको सेना कौन रोकनेवाली है ? फिर देर क्यो, उठो भाई, हमी हमारे वाली है !!

या कवितांमध्ये व्यक्त झालेली जाज्वल्य देशभक्ती आणि क्रांतिची प्रेरणा बघता, जेथे शेकडो कैद्यांनी आत्महत्या केल्या आणि असंख्य कैद्यांना वेड लागले अशा भीषण कारागृहात पन्नास वर्षे शिक्षेची टांगती तलवार डोक्यावर असताना, अत्यंत हालअपेष्टा आणि छळ सोसूनही हा कडवा देशभक्त आपल्या ध्येयापासून जराही विचलित न होता सदैव झगडत राहिला, याबद्दल मनात विस्मय निर्माण झाल्याविना राहत नाही. (लेखक रणजीत सावरकर, सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे कार्याध्यक्ष आहेत.)

**प्रेषक : सौ. मंजिरी श्रीनिवास मराठे, दादर (पृ.क्र. ३९२)**
**सौ. मंजिरी मराठे सावरकर राषट्रीय कोषाध्यक्ष आहेत.)**

## प्रार्थना

आजच्या भौतिक विज्ञानाच्या वातावरणांत माणसाच्या पूर्वीच्या श्रद्धा, निष्ठा याच केवळ नाहीशा झाल्या आहेत असे नव्हे तर त्याच्या जीवनांत एक प्रचंड पोकळी निर्माण होत आहे. मन अशांत निकमालीचें अस्वस्थ झालें आहे. जीवनकलहापायीं तो अधिकाधिक माणुसकीला पारखा होऊं लागला आहे. स्वस्थ, सुखी, प्रसन्न, शांत जीवन हें आतां कल्पनेंतही येईनासें झाले आहे. एकीकडे तीव्र जीवनकलह तर दुसरीकडे जीवनमूल्यांचीच उलटापालट होत आहे.

विज्ञानाच्या प्रगतीमुळेच हर क्षणी सुख-साधनांची अमर्याद निर्मिती होत असून त्याचा उपभोग घेणारे मन मात्र आज जाग्यावर नाही.

विज्ञानाच्या स्पर्धेबरोबरच जीवनाची, म्हणजेच केवळ जगण्याची जी जीवघेणी स्पर्धा जगभर चालू आहे त्याने माणूस अधिक हतबल झाला आहे. जगण्यापेक्षां जगावें कसें ? आणि त्याहीपेक्षां कशासाठी जगावें ? ही समस्या आज विज्ञानानें निर्माण केली आहे.

अशा वेळी मनावरचा असंख्य कारणांनी क्षणाक्षणाला वाढत जाणारा ताण नाहीसा कसा करावा याचे उत्तर जरी विज्ञानाजवळ नसलें तरी तें मानवानें आजवर जी संस्कृति निर्माण केली, जीं जीवनमूल्यें प्रतिष्ठित केलीं, जो जीवनधर्म प्रगट केला त्यांत याचे उत्तर जरूर आहे, आणि तें म्हणजे “प्रार्थना” होय. प्रार्थनेने इच्छाशक्ति वाढते, हुरुप येतो, उत्साह वाढतो, जीवन जगावेंसें वाटू लागते. त्यांत आनंद निर्माण होतो.... मनाला पूर्ण विश्रांति मिळते.....

**चित्रकार राजाराम नारायण मराठे** (पृ.२३५)
१४, ऊद्यमकुंज सोसायटी, रानी सती मार्ग, मालाड (पूर्व), मुंबई-९७.
दुरध्वनी : ०२२-२८७७८६३९

हितगुज वर्गणीदार
**डॉ. सुनिल यशवंत मराठे -**
**माणगाव (रायगड)**
**यांनी देणगीरुपाने रु.११,०००/- व रु. २,०००/- हितगुज अंकासाठी वर्गणी असे मिळून रु.१३,०००/- चा धनादेश पाठविला.**
**त्याबद्दल डॉ. साहेबांचे हार्दिक आभार.**



Marathe Pratishthan

# एकोल्याचा एकटा

निसर्गसमृद्ध असा मावळप्रांत पाहून मनाला एक वेगळी उभारी येते आणि किल्ले पाहून एक वेगळीच ऊर्जा मिळते आणि ती ऊर्जा मिळवायची नाहीच उलट निसर्गाला धुडकावून पुढे जायची वृत्ती मनाला लागून गेली.... जाऊ दे.... त्याला नको तर नको मी मात्र सुखावलो होतो..... त्या दर्शनाने...

मावळ प्रांतातील अनेक किल्ले आहेत तुंग तिकोना, लोहगड विसापूर आणि कोरीगड आणि त्याचा सखा शेजारी तरी एकटा असा घनगड!!!. महेश तेंडूलकर यांचे पुस्तक वाचले आणि शनिवारी सकाळी दुचाकी बाहेर काढली...

या वेळी मीही एकटा होतो, घनगड सारखा. सहाच्या आसपास घरून निघालो. वाशी खाडी पूल, मग पनवेल अशी गावे आणि डावीकडे प्रबळ, कलावंतीण महाल, ईर्शाळगड आणि उजवीकडे माणिकगड असे दरमजल करीत खंडाळा घाट पर केला आणि वातावरणात एकदम गारवा आला.

लोणावळा पार कडून पेठ शहापूरच्या आधी एक भय्याला लिफ्ट दिली. तो आठवडा बाजाराला आंबवणेला निघाला होता. या भागात चलन वलनाचा जरा प्रश्न कठीण आहे असे त्याने सांगून माझ्या ज्ञानकोषात भर टाकली. पुढे परत एकला चलो रे असे निघत पुढे निघालो. साल्सेट, तैलबैला फाटा असे मागे टाकून शेवटी भांबुर्डे आणि त्या पुढील एकोले गाठले. गावात माझ्या आधीच पुण्याहून एक आलेला ग्रुप हजर होता. त्याच्या बरोबर मी निघालो.

गरजाई देवी मंदिर पार करून आम्ही मुख्य किल्ल्यात प्रवेश केला. येथे उजवीकडे एक मोठा कातळ निखळून खाली आला आहे. तो कॅमेऱ्यात बंदिस्त केला. त्याच्या पुढे दोन गुहा आहेत त्यातील एका गुहेत वाघजाई देवीची मूर्ती विसावलेली आहे. त्या पुढे एक घसरडा कातळ टप्पा आहे तो पार करुन देखील पाण्याचे टाकी पाहता येते. येथे शिवाजीट्रेल या संघटनेने लोखंडी दोरी बसवली आहे त्यामुळे सर्व सोपे झाले आहे. नाहीतर जरा जरी पडला तरी एकदम खाली. हे सर्व पाहण्यात इतरांना तीळमात्र देखील स्वारस्य नव्हते. त्यांनी भराभर लोखंडी शिडी पार करुन बालेकिल्ला गाठला.

मी आपला बराच मागे होतो, पण शेवटी बालेकिल्ला गाठलाच. येथे मुंबईचे चारजण भेटले, ते देखील आपल्यातच मश्गुल होते. घनगडला पाहून एका तळ्यात होती बदके पिले सुरेख कविता आठवते. एकोल्यात बिचारा एकटाच वेगळा उभा आहे राजहंसासारखा. आतापर्यंत बरेच किल्ले केले, पण घनगड हा किल्ला लक्षात राहील त्याचे एकच कारण घाट आणि कोकण याचे नेत्रदीपक दर्शन होते. सवाष्णी घाट, त्या मागील सुधागड, तैलबैला साल्सेटचा डोंगर असे विहंगम दृष्य ह्याचि डोळा पाहिले आणि मन तृप्त झाले.

किल्ला करुन मागे फिरलो. पुण्याचा ग्रुप जेवायला बसला, पण मला मुंबईचे वेध लागले होते. दुचाकीवर टांग मारून जीवाचे मावळ करीत कोरीगडचा फोटो, मग शिवलिंग डोंगर आणि मृगगड किंवा भेलीवचा किल्ला वरुन पाहिला. वेगवेगळे पक्षी आणि दोनेक साप यांचे दर्शन करीत गाडी हाकत होतो. आधी एक हिरवा



साप रस्ता पार करताना दिसला. माझ्यामागून येणाऱ्या चारचाकीवाल्यास त्याचे ना सोयर ना सुतक. तो अतिशय वेगाने गाडी घेऊन गेला. मनात विचार आला.... ही आपली निसर्ग आणि प्राणिमात्रांच्या विषयाची आस्था? मन दुखावलं..... खट्टू झालं. अशा माणसांना कोण समजावणार....?

**श्री. निरंजन प्र. मराठे (पृ.१२०)**
**मो.:९८२०७३४८८४**

--------------

## वाचकाचा पत्रव्यवहार

दि. ०५/०२/२०१४

**डॉ.सौ. सुमेधा मराठे**
संपादिका - हितगुज

सप्रेम नमस्कार,

हितगुज हे मराठे प्रतिष्ठान चे मुखपत्र आहे. आपण यासाठी घेत असलेल्या अथक परिश्रम व आवाहनामुळेच हा अंक चालू आहे. हे निर्विवाद सत्य आहे.

सर्व मराठे नक्कीच सकारात्मक प्रतिसाद देतील यात काही शंका वाटत नाहीत.

पुन:श्च रु.११,०००/- देगणगी व रु.२०००/- माझी हितगुज वर्गणी पाठवत आहे त्याचा स्विकार व्हावा ही विनंती.

सर्वार्थाने कुलवृद्धी या उद्देशाने हितगुजसाठी देणगी पाठवत आहे. त्यामुळे मुखपत्रात प्रसिध्दीची आवशक्यता नाही.

धन्यवाद!

आपला
**डॉ. एस.वाय. मराठे**
(बी.डी.एस.(मुंबई) डेन्टल सर्जन



Marathe Pratishthan

# HUNGARY AS I SAW IT THEN AND NOW

**RAMAKANT M. VIDWANS (Page 623)**

In my previous article, I had described in detail, how I came in contact with the Hungarians. I am now writing my impressions about Hungary and the Hungarians as I saw them in the 70s and how I found them during my visits in subsequent decades.

Hungary is a landlocked country of Central Europe. It is situated in the Carpathian Basin and is bordered by Slovakia to the north, Ukraine and Romania to the east, Serbia and Croatia to the south, Slovenia to the southwest and Austria to the west. The country's capital and largest city is Budapest which is situated on the banks of the famous River Danube [Duna]. Hungary has a population of about one crore which is little less than the population of Mumbai. The country occupies an area of about 93,000 sq.km. which is almost one third that of Maharashtra.

Temperatures in Hungary vary from -20°C to 39°C through the year. Distribution and frequency of rainfall are unpredictable due to the continental climate of the country. Heavy storms are frequent after hot summer days, and rainfall is more frequent in the Autumn. Weather conditions in the Great Plain can be especially harsh, with hot summers, cold winters, and scant rainfall. Weather in winter is erratic. While I was there, one evening the temperature was 15°c and overnight, the temperature dropped to minus 5°c.

My initial visits to Hungary to Hungary were between 1977 and 1980 when it was a communist country. Till 1989 Hungary was known as Hungarian People's Republic and was under the guidance of the Soviet Union. Though, common Hungarians did not like the communist regime, no one could dare utter a word against the regime. The whole atmosphere was full of suspicion. One would experience this from the moment of landing at the Airport. Buses taking passengers from the aircraft to arrival hall were escorted by armed guards. Passport was checked not only at the immigration counter but also at the customs counter and at the exit of the terminal building. I was greatly surprised when the immigration officer greeted me with 'Namaste" and handed back my passport with 'Dhanyawad'. The reason was India's cordial relations with the USSR.

In those days, Hungarian Technology and Manufacturing Organizations were not allowed to directly interact with foreign organizations and had to go through a Hungarian foreign trading organization. My first contact with the Hungarians was through Nikex Hungarian Trading Co.

At that time, there were only a couple of first-class hotels in Budapest. There were quite a few good Hungarian and a couple of German Restaurants. International food chains like Mc Donald or Pizza King did not have their presence.

Hungarian economy was a totally controlled economy. Food and clothing was subsidized and extremely cheap. Good heavy woolen suits were available for Rs.500. In those days, Government of India used to release foreign exchange of US Dollars 60 par day for foreign visits. A room in Hotel Duna Intercontinental was available for US Dollars 45 per day and I could comfortably manage my fooding and local transport etc. in the balance US Dollars 15 per day. Hungarian Currency war called Forints. In those days, one U.S. Dollar was equal to about 7 Indian Rupees or 20 Hungarian Forints.

Prior to the communist regime, the country was so highly industrialized that Hungarian Machinery Manufacturers like Ganz were giving a tough competition to international business giants like Westinghouse of America, Hunslet of England and Ansaldo of Italy etc. Hungary had produced the best brains and scientists. Hungarians are very intelligent people and have contributed greatly to the world in many areas such as science, arts, music and technology. Composers like Béla Bartok, Franz Liszt, Albert Szent-György-the inventor of vitamin C, famous publisher Joseph Pulitzer, Oszkar Asboth–the inventor of helicopters, Erno Rubik of Rubik Cube are just a few names from the long list of famous Hungarians.

During the communist regime, because of trade unionism, skilled workers started earning more than supervisors and qualified officers. A stage came when the youngsters aspired to become skilled workers rather than pursuing higher studies.



Marathe Pratishthan

Thus there was a heavy brain-drain and the industries became sluggish and lost their competitiveness.

The picture changed in the eighties when the Soviet Union guided rule came to an end. The Soviet Union got into deep economic troubles and crashed and the central European nations including Hungary suddenly found their freedom. On 23 October 1989, Hungary again became a democratic parliamentary republic. Thereafter, many industrial giants entered Hungary. They threw away the union minded wastrels. Efficiency increased and Industry flourished. The result was that the Hungary came to be considered as Central Europe's most successful and promising countries.

The Hungarians are known to respect women, elders as well as ancestors. In those days, Hungarian people believed in strong familial values. Family was the center of the Hungarian social structure, providing both financial and emotional support for its members. In Hungary, generations of extended family supported each other and lived together, with the family comprising biological parents, grandparents, and usually two children. However, with the time, Hungarians changed and the society slowly became free and permissive, so much so, that country had the highest rate of suicides and divorces. However, now the social structure is returning to that of the old times.

Hungarians are hard working people. In old days, Hungarians were great savers. They always preferred to save the money to buy what they needed rather than taking a bank loan. However, times are changing and slowly Hungarians are becoming big spenders. All leading international hotel chains have set up big hotels. Fast food outlets like Mc Donalds, Burger King, Pizza Hut, KFC, Subway and many shopping malls are now doing roaring business.

Hungarians are rightly proud of their unique, complex, richly expressive language, **Hungarian** (*Magyar* pronounced "mahdyar"). It is a Uralic language most closely related to Mansi and Khanty of western Siberia. It is further sub-classified into the Finno-Ugric languages which include Finnish and Estonian. Because of its complicated grammar, pronunciation and vocabulary, it is one of the most difficult languages to learn. During my business visits, I used to be busy the whole day and would return to the hotel late. All shops used to display a board 'Zarva' which meant closed and that was the only word I could learn.

Hungarians eat a lot of hot spicy food. The national dish is **goulash** which is a thick paprika-laden meat and vegetable stew. In taste, it is very similar to potato curry we make in India minus the meat. Hungarians use a lot of Paprika which is similar to Capsicum. Paprika vary in taste from very mild to very hot. Other specialties are '**aprikás csirke**' - chicken in paprika sauce, and **halászlé**, paprika fish soup often made from carp. Hungarian pancakes (**palacsinta**), both savoury and sweet, are a treat.

Hungary has several famous vine regions, most known are Villány, Eger, Badacsony, Tokaj, **Egri Bikavér** (Bull's Blood of Eger) (HUF 1000 for a good one) is a strong red Hungarian wine. **Tokaj** is known for its sweet dessert wine *Tokaji aszú*. **Pálinka** denotes strong brandy-like liquor distilled from fruit. The best-known varieties are *barackpálinka*, made from apricots, *körtepálinka* from pears, and *szilvapálinka* made from plums. *Pálinka* is a very social drink: just as the English drink tea, the Hungarians, offer *pálinka* as a welcome drink. Palinkas are very strong and contain more than 50% alcohol. A sip of Palinka really shows you where your alimentary canal is located.

Hungarians are great drinkers. One Saturday, after our meetings, our hosts told us that they wanted us to visit a huge underground complex which they had constructed. It turned out to be a huge underground wine brewery. Inside such underground facilities, even in peak winter, it is easy to maintain the temperature at around 8°c which is ideal for brewing. At the end of the visit I had a chance to test the choicest and the best wines of Hungary.

Hungary is also famous for embroidery. Specialty of Hungarian embroidery is that the design appears identical on both sides of the cloth.

Lake Balaton is Central Europe's largest freshwater lake, the sheer vastness giving it the fitting sobriquet of 'Hungarian Sea'. It was Rabindranath Tagore who had famously said this while visiting Hungary "I have seen almost all the countries of the world but I saw nowhere such a beautiful harmony of the sky and the water than that I had the privilege to enjoy on the shore of Balatonfured filling my soul with rapture." and it's been a favourite quotable-quote, now happily used by their tourism industry. He had been invited to Budapest for a poetry-reading convention and its gruelling schedule is said to have taken a toll on his health. Doctor advice brought



Marathi Pratishthan

him to Balatonfured's State Heart Hospital, where he spent a few weeks on his way to recovery. After he recovered, he planted a Lime Tree on the promenade and composed a poem. The poem is now immortalized in the form of the following plaque placed below the tree.




Present Hungary is a member of the European Union, NATO, the OECD, the Visegrád Group, and the Schengen Border-less Europe Agreement. Today, Hungary is one of the 15 most popular tourist destinations in the world, with a capital regarded as one of the most beautiful in the world. Despite its relatively small size, the country is home to numerous World Heritage Sites, the second largest thermal lake in the world (Lake Hévíz), and the largest natural grassland in Europe (Hortobágy). Hungary is home to the largest synagogue in Europe (Great Synagogue) and the largest medicinal bath in Europe (Széchenyi Medicinal Bath).and the second underground in Europe and the third all over the world after New York and London (Millennium Underground).

On 23 October 1989, Hungary again became a democratic parliamentary republic. The country flourished until the financial crisis hit it in 2008. Since then, the economy has been stagnating due to heavy public debt and social tensions have been growing.

**Ramakant Vidwans**
31, Goodwill Assurance Society,
Behind BPL Mobile Centre,
Manmala Tank Road,
Matunga (West),
Tel. : 022-2430526

## मानसन्मान

**कु. मधुरा बिपिनचंद्र आपटे,** पुणे हिला दहावीच्या (मार्च २०१३) परीक्षेत ९५.४५ इतके गुण मिळाले. कु. मधुरा ही आरती विनायक मराठे आणि विनायक शंकर मराठे यांची नात आहे. म.प्र. द्वारा कु. मधुराचे हार्दिक अभिनंद, दि. २६ जानेवारीला वर्धापन दिन कार्यक्रमात मधुराला बक्षिस देण्यात आले. पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा.

**कु. प्रियांका सुधाकर मराठे,** पुणे हिला माध्यमिक शालांत परीक्षेत (२०१३) ९६% गुण मिळाले. दि. २६ जानेवारीला वर्धापन दिन कार्यक्रमात प्रियांकाला बक्षिस देण्यात आले आणि म.प्र. द्वारा प्रियांकाचे हार्दिक अभिनंदन, पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा.

**कु. शुभंकर मिलिंद आपटे** याला १०वी मध्ये ९०% मार्क मिळाले. श्री जयंत मराठे, पुणे हे त्याचे आजोबा आहेत. २६ जानेवारीला वर्धापनादिनी त्याच्या आजोबांनी शुभंकरचे बक्षिस आणि प्रशस्तीपत्रक स्वीकारले. म.प्र. द्वारा प्रियांकाचे हार्दिक अभिनंदन, पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा.

**श्री. मंदार आनंद मराठे** (पृ. २७७) यांना नुकताच पत्रकार संघातर्फे गडकरी रंगायतन, ठाणे येथे यशस्वी उद्योजक पुरस्कार देऊन यांचा सत्कार करण्यात आला. म.प्र. द्वारा श्री. मंदार आनंद मराठे यांचे हार्दिक अभिनंदन.



Marathe Pratishthan

# वायनाड - केरळ - भेट
## अनवट निसर्गाच्या कुशीत

....मोहन मराठे (३६५)
खार, मुंबई.

वायनाड ह्या केरळमधील अप्रतिम निसर्ग सौंदर्याने नटलेल्या भागाला आम्ही बंगळुरूहून १८-१९ ऑक्टोबर २०१३ ला भेट दिली. बरोबर आपले सख्खे शेजारी प्रकाश व कला वैद्य होते.

केरळच्या ईशान्येला असलेला वायनाड हा जिल्हा केरळमधील सर्वात छोटा जिल्हा असून त्याच्या बाजूला कर्नाटकचा कूर्ग हा जिल्हा आहे. वायनाड हा पश्चिम घाटाचा भाग पूर्वी जुन्या संस्कृतीचा मायाक्षेत्र म्हणून ओळखला जायचा. मायाक्षेत्राचे मायनाड व भाताचे (वायळ) क्षेत्र म्हणून वायळनाड व अखेरीला वायनाड झाले.

पश्चिम घाटातील ह्या प्रदेशात सह्याद्रीची ७०० ते २१०० मिटर उंचीची शिखरे आहेत. महाराष्ट्रात सह्याद्रीचे सर्वात उंच शिखर कळसुबाई (नाशिक) १७०० मिटर उंचीचे आहे.

वायनाड भाग केरळ कर्नाटक तामिळनाडू ह्यांच्या संयुक्त सरहद्दीतील जंगलपट्टीचा भाग येतो म्हणून तेथे वन्यप्राणी विशेषत: हत्ती मोठ्या प्रमाणावर आहेत.

वायनाड भाग पुरातन असला तरी त्याचा ज्ञात इतिहास १८व्या शतकापासून सुरु होतो. कोट्टायमच्या पझासी (वर्मा) राजघराण्याच्या अधिपत्याखालील हा प्रदेश म्हैसूरचा राजा हैदरअली ने जिंकून आपल्या अधिपत्याखाली आणला. त्याचा मुलगा टिपू सुलतानने हा प्रदेश कोट्टायमच्या राजाला परत सुपूर्द केला. (टिपु सुलतानने बांधलेला किल्ला सुलतान बथेरी वायनाड येथे आहे). टिपु सुलतानचा लॉर्ड कॉर्नवालिसने पराभव केला. व टिपू सुलतानचा हा प्रदेश इंग्रजांच्या ताब्यात आला. टिपू सुलतान विरुद्धच्या लढाईत मराठ्यांनी धर्तपणाने इंग्रजाना मदत केली. टिपू सुलतानाला इंग्रजांबद्दल राग होता व त्याने फ्रेंचांशी संधान बांधले. पण मराठ्यांच्या मुलुख त्याने घेतला नसेल. मराठ्यांचा विश्वासघात मैत्रीचे अमिष दाखवून केला. म्हणून धूर्त नाना फडणीसाना त्याला धडा शिकवायचा होता. त्याचबरोबर इंग्रज कॉर्नवॉलिसलाहि मर्यादेत ठेवायचे होते. मराठा अस्मिता दाखवणाऱ्या नाना फडणीस व महादजी शिंदे ह्यांच्या निधनानंतरच इंग्रजाना मराठा राज्य जिंकून भारताचे शहेनशाहा होता आले. इंग्रजां विरुद्ध काट्टायमच्या वर्मा घराण्याच्या राजाने गनिमी काव्याने प्रखर लढा दिला. पण त्याचा पराभव झाला. वायनाडमधील भानववाडीच्या घनदाट जंगलात त्याने आत्महत्या केली. जेथे त्याची समाधी आहे. तो राजा रवी वर्मा वंशातील होता.

ब्रिटीशांच्या ताब्यात हा प्रदेश आल्यावर विकासास म्हणजे आधुनिक इतिहासास सुरुवात झाली. केरळमधील कोझिकोडे (त्यावेळचे कालिकत - जेथे वास्को द गामा प्रथम उतरला) पासून तळासरी ह्या घाटात ब्रिटीशांनी रस्ता बांधला. तो पुढे म्हैसूरपर्यंत व दुसऱ्याबाजूला गुडाळूर पर्यंत बांधून तो म्हैसूर उटी रस्त्याला जोडला.

घाटमाथ्यावर उतारवर चहाचे मळे उभारले. जंगलामध्ये साग आहे, सिल्वर ओक आहे. त्यांच्या छायेत कॉफी मळे उभारले. सिल्वर ओकच्या झाडावर मिरीचे वेल पसरले. लवंगा, वेळदोडे दालचिनी मसाल्याचे जिन्नस पिकू लागले.

उंच डोंगरावर प्रचंड पावसामुळे जळप्रपात निर्माण होतात. ने काविनी नदीला मिळतात व ही नदी पुढे कावेरीला परिपुष्ट करते. डोंगरावर भरपूर झाडी आहे. झाडीमुळे माती टिकून आहे व मातीमुळे झाडे टिकून आहेत. घनदाट जंगलामुळे वन्य प्राण्यांचे नैसर्गिक वास्तव्य असलेले नागरहोळ, मुदुमलाई, बंदीपूर हे भाग एकमेकाला जोडलेले आहेत. येथे आशियातील हत्तींच्या कळंपाचे सर्वात मोठे वास्तव्य आहे. आम्हाला वन्यप्राणी पहावयास सवड नव्हती व आम्ही भारतात - परदेशात हे प्राणी खूप पाहिल्याने खास आकर्षण नव्हते.

आम्ही १८ ऑक्टोबरला ८ तासाचा कारचा कंटाळवाणा प्रवास करुन म्हैसूर - सुलतान थेरी मार्गे दुपारी ४.०० वा मीनपुट्टी धबधब्याजवळील रिसॉर्टवर उतरलो बाजूला डोंगरावर चहाचे मळे - मधे धबधबा - त्याचा गाळ - पाण्याचे प्लेट - हलकासा पाऊस - ढग धुके उन्हं ह्यांचा लपवाछपवीचा खेळ, फुले पाने वेली त्यांपुढे आमचा प्रवासाचा शीण कुठल्याकुठे पळाला. गाडीतील सामान रिसॉर्ट मधील रुमच्या बाहेर ठेवून रुममध्ये स्थिरन होता अगदी अनवट निर्सगाच्या कुशीत धावलो. काय पाहू काय नाही - आपल्याला दिसलेल्या गोष्टी इतरांना दाखवण्याची आतुरता - खाली निसरड्या पायवाटेने जाऊन वाटाड्याच्या मदतीने धबधबा ३०० फूट खाली पडलो त्याच्या वरच्या टोकास वाटाड्याचा हात धरून दृष्टी स्पर्श करुन आलो अंधारपडे पर्यंत आम्ही पहातच राहिले.



Marathe Pratishthan

अंधार पडल्यावर रुमबाहेर चहा स्टॅक्सवर ताव मारला - रुम वरती व पँट्री खाली तेथून चहा फराळ वेटरने स्कूटरवरुन आणला. जेवायला सर्व जण खाली उतरून गेले.

मी रात्रीचे जेवण घेत नसल्याने रुममध्ये भारत ऑस्ट्रेलिया एक दिवसीय क्रिकेट मॅच पहात राहिले. धोनीची १३९ धावांची तुफान फलंदाजी शर्मांने ४८ व्या शतकात ऑस्ट्रेलियाला ३० धावा देऊन धुळीस मिळवल्याचे पाहिले.

रात्री गप्पागोष्टी करत आम्ही झोपलो. मला पहाटे ४.०० वा. जाग आली. बाहेर जावुन पाहिले तर सर्वत्र अंधार त्याच्यामध्ये धबधब्याचा आवाज थोडा भीतिदायकच वाटला. थोडा वेळ बसून मी रुममध्ये परतलो. सकाळी ६.०० वा. उठून फिरलो. समोरच्या डोंगरावर वरपासून खालपर्यंत चहाचे मळे - उभ्या गोल डोंगरावर सिताफळा वरील फोडा सारखे वाटत होते, आम्ही डोंगरावर गेलो. पाऊस थांबला होता पण ढग घोटाळत होते. धुके पसरले होते. धुके व ढग ह्यात नेमका फरक काय ? एक घन मैला (१ मैल सबंदर उंच) धुक्यात एक गॅलन (४$^1/_2$ लिटर) पेक्षा कमी पाणी असते. तितक्या ढगात किती असते ?

रात्री पाऊस पडल्याने धबधब्याचे गढूळ पाणी जोरात धावत होते. छोटे छोटे पक्षी बांबू वेली, फुले, पाने ह्यामधून आम्हाला चकवून पळत होते. समोरच्या डोंगरापल्याडचा भाग तामिळनाडूत - तेथून एक हत्ती पाण्याचा प्रवाह ओलांडून कंपाऊंड तोडून आमच्या रिसॉर्टच्या आत पूर्वी एकदा आला होता असे वाटाड्याने काल सांगितले होते.

सकाळी आम्ही चहावर परत चहा घेतला व खाली उतरून अप्रतिम नाश्ता घेतला. फलरस अप्रतिम इडली सांभार, पुरी छोले, उपमा, ब्रेड टोस्ट, ऑम्लेट, उत्तम कॉफी, पँट्री समोर परत धबधब्याचे आकंठ दर्शन घेतले.

११ वा. आम्ही रिर्सोटला रामराम केला - पुकोट केरळ गेले. डोंगरामधील सरोवराला भेट द्यायला खुप लोक आले होते. बोटिंगसाठी लांब क्यू होता. खूप वेळ लागणार होता म्हणून आम्ही बोटिंग टाळले तेथे मसाल्याचे जिन्नस खरेदी केले स्वस्त व मस्त !

आम्ही सुलतान बयेरी - गुंडळूपेटला गेले. तेथे जेवण केले व म्हैसूरमार्गे रात्री १० वा. बंगलोरला पोहोचलो. थोडक्यात सांगायचे म्हणजे माझ्या आजवरच्या असंख्य प्रवासात हा प्रवास सर्वात त्रासदायक झाला. पण निसर्गाच्या कुशीत विसावण्याचा हा सर्वात संस्मरणीय अनुभव !


**मोहन मराठे (पृ.३६५),**
५, राम भुवन, अहिंसा मार्ग,खार, मुंबई
फोन : २६४६४३५१
मो.: ९८१९९६४७६५


## श्री गणेशाच्या आवडत्या २१ आकड्याचे रहस्य :-

श्री गणेशाच्या आवडत्या २१ आकड्याचे रहस्य :-

श्री गणेश हा आपला आद्य देव आहे. तो मानवाला २० गोष्टींचा त्याग करुन एकाचा स्वीकार करायला शिकवतो.

२१ मोदक त्याला प्रीय आहेत. त्याला २१ मोदकांचा नैवेद्य दाखविला तर तो एकच मोदक हातात घेतो किंवा सोंडेत ठेवतो. उरलेल्या २० मोदकांचा त्याग करा असे म्हणतो. ते २० मोदक दु:खकारक आहेत. त्यामध्ये षड्रिपू (६) प्रपंच (५) अंत:करण चतुष्य (४) त्रिगुण (३) द्वैतभाव (२) या सर्वांची बेरिज २० येते. ही संख्या क्रमाने उतरती आहे. ६,५,४,३,२ यांचा त्याग श्री गणराया चरणी करणे म्हणजे २१ चे परिपूर्ण समर्पण म्हणून २१ अंक प्रिय आहे.

१) षड्रिपूंची निर्मिती म्हणजे दु:ख - काम, क्रोध, लोभ, मद, मोह, मत्सर.

२) प्रपंच : ५ चा समूह आपल्या शरीरात आहे. (१) पंचज्ञानेंद्रीये (२) पंचमहाभुते (३) पंच प्राण (४) पंचतन्मात्रानाच प्रपंच म्हणायचे. (४) पंच कर्मेद्रीयेयानाच प्रपंच म्हणायचे.

३) अंत:करण चतुष्टय : अंत:करणात चार चा समावेश आहे. (अ)मन (ब) बुद्धी (क) चित्त (ड) अहंकार.

४) त्रिगुण : दु:खाचा मूळ घटक म्हणजे त्रिगुण सत्व, रज, तम.

५) द्वैतभाव : त्रिगुणांपेक्षा सुक्ष्म विचार केला तर दु:खाचे एकमेव कारण म्हणजे द्वैत (अ) आपण स्वत:चे स्वरुप विसरुन, अपवित्र अशा मर्त्य शरीराला आपण स्वत: आहोत असे समजू लागतो.

ब) देहनिष्ठा हीच दु:खाची गंगोत्री आहे.

तेव्हा कोणत्याही २१ गोष्टी श्रीगणेशाला अर्पण करताना त्याच्या जवळ आत्मनिवेदन करायचे. त्याच्या जवळ वार्तालाप करायचा. हे श्री गणेशा तुला एक अर्पण करते व वीस दु:खकारक गोष्टींचा मी त्याग करते.

श्री गणेश म्हणतो मला सर्व म्हणजे २१ देऊन टाका मला २१ प्रीय आहेत.

हे ज्याला जमते त्याला इथेच मुक्ती मिळते. तात्पर्य म्हणजे आपण २० दु:खकारक गोष्टींचा त्याग करायचा प्रयत्न केला पाहिजे.

**"संकलन " श्रीमन्मुदगल पुराणातून**


**सौ. जयश्री विनायक मराठे (पृ.३०७)**
६/७ श्रीकुटीर को.ऑ.हा.सोसायटी,
अयोध्या नगरी, डोंबिवली (पूर्व)
टेली. : २४२४४०३




Marathe Pratishthan

## पं. प्रमोद धुंडिराज मराठे

मोठमोठया शास्त्रीय संगीत गाणाऱ्या कलाकारांबरोबर हार्मोनियमची उत्तम साथसंगत करणारे प्रसिद्ध हार्मोनियम वादक पं. प्रमोद मराठे गांधर्व महाविद्यालयाचे सध्याचे प्राचार्य आहेत. अनेक दर्जेदार शिष्य त्यांनी तयार केले आहेत. परदेशातही आपल्या हार्मोनियमची मोहोर ते उठवून आले आहेत. गांधर्व महाविद्यालयातही अनेक उपक्रम एक तपापेक्षा जास्त काळ ते राबवत आहेत. पुण्याप्रमाणे बारामती, फलटण, केडगांव येथील विद्यार्थ्यांसाठी पण शाखा काढण्यात ते यशस्वी झाले आहेत.

तन-मन-धनाने जेंव्हा एखादे कार्य माणूस करतो तेंव्हाच यशस्वी होतो याचे जिवंत उदाहरण म्हणजे प्रमोदजी, संगीताचा वारसा घरातूनच मिळाला. त्यांचे वडिल कै. धुंडिराज गोविंद मराठे - संगीत प्रविण यांचेकडे संगीताचे शिक्षण त्यांनी लहानपणी घेतले. त्यानंतर शाळेत ८ वी - ९ वीत असताना हार्मोनियमशी त्यांची जी दोस्ती झाली त्यात प्राविण्य मिळवण्यात त्यांना यश आले. संवादिनीकार पं. मनोहरपंत चिमोटे हे त्यांचे गुरु. स्वत: १२-१२ तास रियाज करुन हे प्रभुत्त्व त्यांनी मिळवले आहे हे विसरता येणार नाही.

"गतीशिवाय प्रगती नाही" हे ओळखणारे प्रमोदजी म्हणजे माझा धाकटा भाऊ आहे हे सांगायला मला आनंद आणि अभिमान वाटतो.

**श्री प्रमोद मराठे प्राचार्य, गांधर्व महाविद्यालय, पुणे**
४७५, शनिवार पेठ, पुणे - ४११०३०. दूरध्वनी - ९८२३०१६४६८

---


## सौ. परिणिता प्रमोद मराठे

ज्ञानप्रबोधिनीच्या शाळेत शिकलेली सौ. परिणिता हुशार तर आहेच त्याचबरोबर अतिशय शिस्तप्रिय आणि नवविचारांची कांस धरणारी आहे. कलाप्रेमी असल्यामुळे उत्तम हार्मोनियम वादक आहे. हार्मोनियम विशारद पं. प्रमोद मराठे यांचेकडे पुढील शिक्षण घेतले आणि एम्.ए. पण हार्मोनियम मध्ये केले.

शाळेपासून संस्कृत आणि जर्मन ह्या विषयांचा तिचा विशेष अभ्यास आणि परीक्षा झाल्या आहेत. सुंदर हस्ताक्षर आणि नीटनेटकेपणा ह्या गुणांमुळे तिच्या पुढील करिअरमध्येही त्याचा उपयोग होतो आहे. ती सासरी आली आणि मराठ्यांचे दुसरे घरच असलेल्या गांधर्व महाविद्यालयाशी जोडली गेली. तिच्या ह्या सर्व गुणांना तिथे भरपूर वाव मिळाला आणि मिळालेल्या संधीचे तिने चिज केले. स्वत:बरोबर विद्यालयाच्या प्रगतीमध्येही तिचा मोलाचा वाटा आहे. आता तर नृत्यकलेमध्येही ती प्राविण्य मिळवत आहे. पाककलेमध्येही ती सुगरण आहे.

आणि मला सांगायला विशेष कौतुक वाटते, ती माझ्या धाकट्या भावाची पं. प्रमोद मराठे याची पत्नी आहे. वरील सर्वच गोष्टींमध्ये तिचे विशेष प्राविण्य आहे. त्याचा उपयोग गांधर्व महाविद्यालयाला होतो आहे.

**सौ. परिणित्ता मराठे**
गांधर्व महाविद्याल, पुणे
४७५, शनिवार पेठ, पुणे - ४११०३०.
दूरध्वनी - ९८५०६०१३५६



प्रेषक
**सौ. वर्षा गोडबोले (पृ.१२९)**
संचालिका, सरगम संगीत विद्यालय
रघुनंदन, ४५, मयूर कॉलनी,
कोथरूड, पुणे ४११०३८.
दूरध्वनी २५४३९७६४/९८२२७५४६४०.

**हितगुज वर्गणीदार : देणगीदार कुलबांधवांची नावे**

**श्री. विनायक मराठे, बोरिवली, श्री. मिलिंद सुधाकर मराठे, पुणे, डॉ. सुनिल मराठे,**

**हितगुजला वर्गणी-देणगी दिलेल्या सर्व कुलबांधवांचे आभार. अनवधनाने एखादे नाव राहिले असल्यास क्षमस्व.**

**: विशेष सूचना :**

**"हितगुज"राखीव फंड निधी शक्यतो चेकद्वारे "मराठे प्रतिष्ठान" या नावाने संपादिकेच्या पत्त्यावर पाठवावा. तसेच मराठे प्रतिष्ठानची सारस्वत कॉपरेटिव्ह बँक, वरळी शाखा, अकाऊंट नंबर : ०१०२००१०००२२४४८ IFSC Code : SRCB 0000010 असा आहे. येथे फंड निधी जमा करा. जमा केल्यास आपले नाव कळवावे.**

Marathe Pratishthan

# संवाद कुलबांधवांशी

नमस्कार कुलबांधव आणि भगिनिंनो,

सन २०१४ चा हा पहिला अंक, आपणां सर्वांना नविन वर्षाच्या खूप खूप शुभेच्छा. डिसेंबर २०१३, पासून मी आपणाशी संवाद साधणे सुरु केले. अंक वाचल्यानंतर प्रतिक्रिया मिळाल्या, त्या उत्साह वाढविण्याऱ्याच होता. त्यामुळे यापुढे असाच आपणाशी संवाद सुरु राहील.

मी मागील अंकामधे म्हटल्याप्रमाणे आमची अपेक्षा अशी आहे की, आपल्या कुलबांधवांनी एकत्र येणे व आपल्या विभागामधे मेळावे घेणे, व इतर कार्यक्रम घेणे, जेणेकरून एकमेकांशी संवाद वाढीस लागेल. या अनुषंगाने जेथे जेथे असे प्रयत्न सुरु आहेत, त्यांनी आम्हाला जरुर कळवावे, त्यास योग्य ती प्रसिद्धी दिली जाईल.

ठाणे येथील माहेरवाशीण श्रीमती कुमुद डोके यांचा अंक वाचल्यावर लगेच फोन आला. त्यावेळी त्या करत असलेल्या उपक्रमांबद्दल माहीती कळली. फार अभिमान वाटला. कणकवली येथे गेलो असता श्री. मंदार मराठे यांची भेट झाली. बोलता बोलता कळले, त्यांच्या हरकूळ या गावी असलेल्या सर्व मराठे कुटुंबीयांचा एकच गणपती असतो. हा आदर्श घेण्यासारखा आहे. त्यांनादेखील त्यांचे इतर उपक्रम हितगुजसाठी कळविण्यास सांगितले.

अशाच प्रकारे आपल्यापैकी कोणीही काही कार्य करत असेल तर जरूर कळवा, इतरांनाही कळू द्या व त्यापासून प्रेरणा घेऊ द्या.

हितगुजचा हा ९७ वा अंक म.प्र. सोबत हितगुज चे ज्यांनी रोप लावले त्याला आता फुले, फळे येऊ लागली आहेत. व डिसेंबर २०१४ चा अंक हा १०० वा अंक असणार आहे. तेव्हा हा शतकमहोत्सवी अंक विशेष असा काढायचे ठरविले आहे. त्यासाठी आपणा सर्वांच्या सहकार्याची आवश्यकता आहे. ज्यांना त्यासाठी लेख, कविता, व इतर साहित्य पाठवायचे असेल त्यांनी जरूर पाठवावे. त्याचबरोबर अशा विशेष अंकासाठी आर्थिक पाठबळ ही गरजेचे आहे. त्यासाठी ज्यांना शक्य असेल त्यांनी देणगी तसेच जाहीरातीद्वारे हातभार लावावा म्हणजे आपला हितगुज १०० वा अंक संग्राह्य बनू शकतो.

या महिन्यामधे ३१ मार्च ला गुढीपाडवा आहे. आपणा सर्वांना गुढीपाडव्याच्या अनेक अनेक शुभेच्छा !

मराठे प्रतिष्ठानच्या गोवा परिवाराचे विभागीय संमेलन ता. २३/०३/२०१४ रोजी आयोजित केले आहे. सर्व कुलबांधव आणि कुलभगिनीना आग्रहाचे आमंत्रण ! सदर कार्यक्रमासाठी संपर्क श्री. प्रदिप मराठे गोवा : ९८८१५५३१९०.

- श्री हेमंत अरुण मराठे (पृ.२१)
**कार्यवाह, मराठे प्रतिष्ठान**
**बी-१०२, शांतीनाथ ॲव्हेन्यू, चक्रधर नगर, नालासोपारा (प.), जि. ठाणे - ४०१२०३.**
**फोन : ९२२०६९९९५७/९८२२८४७१२०**

**"हितगुज" साठी जाहिराती द्याव्यात**

अभिनंदन, अभिष्टचिंतन, पुण्यतिथी, पुण्यस्मरण, साठावा वाढदिवस, अमृत महोत्सव, सहस्त्रचंद्र दर्शन या निमित्ताने किंवा आपल्या उद्योगव्यवसायाच्या जाहिराती देऊन "हितगुज"ला सहकार्य करावे.

पाव पान रु. ६००/- अर्धे पान रु. १,२००/- पूर्णपान रु. २,५००/-

रक्कम "मराठे प्रतिष्ठान" नावाने संपादिकेच्या पत्यावर चेकने पाठवावी.

Marathe Pratishthan

# मेसर्स. वामन शंकर मराठे प्रा. लि.

अभिवादन, १ला मजला, शिवाजी पथ, ठाणे ४००६०२

फोन नं. : ०२२-२५४२३३३७/२५४२२४९४

# वामन शंकर मराठे ज्वेलर्स

१,४ पूजाविहार को. ऑप. हौ. सो.,

राम मारूती रोड, ठाणे (प.) - ४०० ६०२

फोन नं.: ०२२-२५४२४७८६/२६६६६६६६

# वामन शंकर मराठे ज्वेलर्स

१, अंकिता, नवघर रोड, मुलुंड जिमखान्यासमोर,

मुलुंड (पू.), मुंबई - ४०० ०८१.

फोन नं. : ०२२-२१६३५७६७

E-mail : vsmarathejewellers@gmail.com
Website : www.vsmarathe.com


**If undelivered, please return to**

**संपादिका : 'हितगुज'**

८/१३, सहकार नगर,

वडाळा,

मुंबई - ४०० ०३१.

मराठे परिवाराला नवीन वर्ष सुखसमृद्धीचे व समाधानाचे, उत्तम आरोग्याचे आणि भरभराटीचे जावो, ह्या शुभेच्छा !


त्रैमासिक "हितगुज" हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई-३१. दूरध्वनी : २४१५०८८९ ई-मेल: prabhakar_marathe@yahoo.com
ई-मेल: (१) sitaram_khambete@yahoo.com (२) maratheparivar@yahoo.co.in ◉ वेबसाईट : www.marathepratishthan.org


Marathe Pratishthan